www.dainikmahabharat.com RNI No. MAHMAR/2015/64418 jaymahabharat2015@gmail.com



# दैनिक महाभारत

संपादक – विजयकुमार वाव्हळ

**जालना : रामनवमीच्या पार्श्वभूमीवर ८० जणांना एक दिवसासाठी जिल्ह्यातून हद्दपार**

महाराष्ट्र • बीड (महाराष्ट्र) • दैनिक • मराठी • वर्ष – १० • अंक २३४ • रविवार दि.०६ एप्रिल २०२५ • किंमत २ रू. • पाने ६

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक

स्वतः वाहतात शिव्यांची लाखोली दुसऱ्यांना शिकवतात गरिमेचा भाव सर्वज्ञानी रडत रौतांचा रडीचा डाव
काय हो रडत रौत मला गरिमा शिकवता आणि स्वतः मात्र नागडा करेन ही भाषा वापरता?
चित्रा किशोर वाघ



संसद के दोनों सदनों से वक्फ (संशोधन) विधेयक और मुसलमान वक्फ (निरसन) विधेयक का पारित होना देश के लिए एक ऐतिहासिक क्षण है। यह सामाजिक-आर्थिक न्याय, पारदर्शिता और समावेशी विकास की हमारी सामूहिक प्रतिबद्धता को सामने लाता है। यह विशेष रूप से उन लोगों के लिए फायदेमंद होगा, जो लंबे समय से हाशिये पर रहे हैं, जिनकी आवाज अनसुनी रही और जिन्हें अवसरों से वंचित रहना पड़ा है।
नरेंद्र मोदी



उत्तर प्रदेश के चंदौली जनपद के मुगलसराय स्थित रावत बस्ती में सरकार द्वारा शराब का ठेका खोले जाने का कड़ा विरोध किया जा रहा है। इस बस्ती में बहुजन समाज के लोग बहुसंख्यक हैं, लेकिन सरकार यहां मूलभूत सुविधाएं देने के बजाय शराब की दुकान खोलने पर आमादा है।
चंद्रशेखर आझाद



संसद में वक़्फ संशोधन बिल पर सत्ता व विपक्ष को सुनने के बाद, निष्कर्ष यही निकलता है कि केन्द्र सरकार यदि जनता को इस बिल को समझने के लिए कुछ और समय दे देती तथा उनके सभी सन्देहों को भी दूर करके जब इस बिल को लाती तो यह बेहतर होता।
मायावती



# वक्फ दुरुस्ती विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी, कायदा बनला

नवी दिल्ली – शनिवारी संध्याकाळी उशिरा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वक्फ (दुरुस्ती) विधेयकाला मान्यता दिली. सरकारने नवीन कायद्याबाबत राजपत्र अधिसूचना जारी केली. आता केंद्र सरकार नवीन कायद्याच्या अंमलबजावणीच्या तारखेबाबत स्वतंत्र अधिसूचना जारी करेल. २ एप्रिल रोजी लोकसभेत आणि ३ एप्रिल रोजी राज्यसभेत १२ तासांच्या चर्चेनंतर हे विधेयक (आता कायदा) मंजूर झाले.

काँग्रेसचे खासदार मोहम्मद जावेद, एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी आणि आपचे आमदार अमानतुल्ला खान यांनी नव्या कायद्याला स्वतंत्र याचिकांमध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकांमध्ये असे म्हटले आहे की वक्फ सुधारणा कायदा मुस्लिम समुदायाविरुद्ध भेदभाव करतो. हा कायदा मुस्लिमांच्या मूलभूत अधिकारांचेही उल्लंघन करतो.यावर केंद्रीय मंत्री रिजिजू म्हणाले की, या कायद्याचा उद्देश वक्फ मालमत्तेतील भेदभाव, गैरवापर आणि अतिक्रमण थांबवणे आहे. या विधेयकाला (आता कायदा) राज्यसभेत १२८ सदस्यांनी पाठिंबा दिला, तर ९५ सदस्यांनी विरोध केला. २ एप्रिल रोजी रात्री उशिरा लोकसभेत ते मंजूर झाले. या काळात २८८ खासदारांनी समर्थनात मतदान केले तर २३२ खासदारांनी विरोधात मतदान केले.



## वक्फ दुरुस्ती विधेयकाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात तिसरी याचिका

शनिवारी आपचे आमदार अमानतुल्ला खान यांनी या विधेयकाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. शुक्रवारी याआधी सर्वोच्च न्यायालयात दोन याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. बिहारमधील किशनगंज येथील काँग्रेस खासदार मोहम्मद जावेद आणि एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी ही याचिका दाखल केली आहे.

गुरुवारी राज्यसभेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर काँग्रेस खासदार जयराम रमेश यांनी काँग्रेस सर्वोच्च न्यायालयात जाईल असे म्हटले होते. तामिळनाडूच्या द्रमुकनेही याचिका दाखल करण्याबद्दल बोलले होते.

# महाराष्ट्र सैनिकांनो, तूर्तास थांबा


## राज ठाकरे यांचे आंदोलन थांबवण्याचे आवाहन

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बँकांमध्ये मराठी भाषेच्या वापरासाठी सुरू असलेले मनसेचे आंदोलन तूर्तास थांबवण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले आहे. गुढीपाडव्याच्या मेळाव्यात केलेल्या आवाहनानंतर मनसैनिकांनी बँकांमध्ये जाऊन मराठीसाठी जाब विचारण्याचे आंदोलन सुरू केले होते.

राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना पत्र लिहून म्हटले आहे की, आता हे आंदोलन थांबवायला हरकत नाही, कारण आपण या विषयावर पुरेशी जनजागृती केली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायदा हातात घेतल्यास कारवाई केली जाईल असा इशारा दिला होता. त्यावर उत्तर देताना राज ठाकरे म्हणाले, आम्हालाही कायदा हातात घ्यायची इच्छा नाही. पण रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार मराठीचा सन्मान करणे तुमचं काम नाही का?

दरम्यान, आज सकाळी उदय सामंत राज ठाकरे यांच्या भेटीस गेले होते. या बैठकीनंतरच हे आंदोलन थांबवण्याचा निर्णय जाहीर झाला.उदय सामंत यांनी राज ठाकरे भेटीनंतर म्हटले की, ‘आज मराठीच्या संदर्भात ज्या घडामोडी चालू आहेत. त्यांसंदर्भात राज ठाकरेंनी मला भेटायला बोलवलं होतं आणि इथे येताना मी एकनाथ शिंदेंची परवानगी घेऊन आलो होतो. महत्त्वाचा मुद्दा असा की, महाराष्ट्रात ज्या काही संस्था आहेत. बँका आहेत त्यात मराठीच्या बाबतीत निर्णय घेतला जातो. किंवा तिथे ज्या काही गोष्टी घडतात. त्याचा प्रतिबंध कसा करायचा. त्या संदर्भात राज ठाकरेंनी काही सूचना केल्या आहेत.उदय सामंत म्हणाले, राज ठाकरेंनी मराठीच्या मुद्द्यावर चर्चा केली. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी



बोलणार आहे. बँकांमध्ये मराठी व्यवहार सुनिश्चित करण्यासाठी समितीची बैठक घेऊन पुढील निर्णय घेतला जाईल.

राज ठाकरेंनी स्पष्टपणे सांगितले की, महाराष्ट्रात अनेक भाषा बोलल्या जातात. अनेक राज्यातील लोक महाराष्ट्रात आले आहेत. अनेक ठिकाणी मराठी भाषिकांवर अन्याय केला जातो, दादागिरी केली जाते. त्यावर काहीतरी कायदेशीर वलय असले पाहिजे. त्यामुळे राज्यातील ज्या बँका त्यांचे व्यवहार मराठीत झाले पाहिजे यासाठी सर्व समित्यांची बैठक घेईन आणि काय कारवाई करता येतील याबाबत निर्णय घेऊ, असेही सामंत यांनी म्हटले आहे.

राज ठाकरेंनी पत्रात काय लिहिलं आहे ?सर्वप्रथम महाराष्ट्रात मराठीच्या मुद्द्यासाठी तुम्ही पुन्हा एकदा जो एक जोरदार आवाज उठवलात त्यासाठी तुमचं मनापासून अभिनंदन.मी गुढीपाडव्याच्या मेळाव्यात तुम्हाला आदेश दिला होता की महाराष्ट्रातील बँकांमध्ये मराठीत व्यवहार होत आहेत की नाही हे पहा, आणि नसल्यास त्याबद्दलची जाणीव त्या बँकेच्या प्रशासनाला करून द्या. दुसऱ्या दिवशीपासून तुम्ही महाराष्ट्रात सर्वदूर बँकांमध्ये गेलात, तिथे मराठीचा आग्रह धरलात, हे उत्तम झालं; यातून मराठी भाषा आणि मराठी माणूस यांना कोणी गृहीत धरू शकत नाही हा संदेश जसा गेला, तसंच सर्वदूर असलेली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची संघटनात्मक ताकद पण दिसली.पण आता हे आंदोलन थांबवायला हरकत नाही, कारण आपण या विषयांत पुरेशी जागृती केली आहे, आणि हे घडलं नाही तर काय होऊ शकतं याची चुणूक दाखवली आहे. आता मराठी जनतेनेच आग्रह धरायला हवा आणि आपल्या मराठी समाजानेच जर कच खाल्ली, तर मग ही आंदोलने तरी कशासाठी करायची ?आणि सगळ्यात महत्वाची जबाबदारी सरकारची आहे. रिझर्व्ह बँकेचा नियम त्यांना माहीत आहे आणि त्या नियमाची अंमलबजावणी करून घेणं ही आता सरकारची जबाबदारी आहे. काल कुठेतरी माध्यमांशी बोलताना राज्याचे मुख्यमंत्री म्हणाले की आम्ही कोणाला कायदा हातात घेऊ देणार नाही. तशी इच्छा आम्हालाही नाही, पण तुम्ही कायद्याचे रक्षक आहात, तर मग रिझर्व्ह बँकेच्या नियमाची अंमलबजावणी करणं पण तुमचंच काम नाही का ? तुम्ही बँकांना आणि इतर आस्थापनांना मराठीचा सन्मान करायला लावा, मग आम्ही कायदा हातात घेणार नाही हे नक्की.त्यामुळे महाराष्ट्र सैनिकांनो, तूर्तास आंदोलन थांबवा पण या मुद्द्यावरचं लक्ष हटू देऊ नका ! सरकारलाही माझे सांगणे आहे की परत कुठे नियम पाळला जात नसेल, आणि मराठी माणसाला गृहीत धरलं जात असेल, किंवा अपमान केला जात असेल तर पुन्हा तिथे माझे महाराष्ट्र सैनिक त्यांच्याशी चर्चा करायला अवश्य जातील !

## कोकाटेंच्या वादग्रस्त विधानावर बावनकुळे यांनी मागितली माफी

नागपूर : कुठल्याही मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळू नये, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे काय बोलले, मला माहिती नाही. ते मी नंतर बघेन. मात्र, सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. शेतीचे पंचनामे करणे आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची



जबाबदारी ही सरकारची आहे. मंत्री कोकाटे काही बोलले असेल, तर सरकार म्हणून मी शेतकऱ्यांची माफी मागतो, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.. आज विदर्भ विशेषत नागपूर अमरावती जिल्ह्यामधील जे नुकसान झाले त्याबद्दल बैठक आणि पंचनामा सुरू आहे. एकही शेतकरी मदतीपासून सुटू नये, ही जबाबदारी अधिकाऱ्यांना दिलेली आहे. सर्वेक्षण सुरू आहे. ज्या ज्या शेतकऱ्याचे नुकसान झाले त्यांना नियमाप्रमाणे मोबदला दिला जाईल. विदर्भातील, नागपूरमधील जे नुकसान झाले आहे. पंचनामे बोलवले आहे. शेतकऱ्यांना एक डिमांड पाठवावी लागते. त्यावर बैठकीत चर्चा होईल.

# तुम्ही शस्त्रे टाका, मुख्य प्रवाहात या

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे नक्षलवाद्यांना आवाहन

बस्तर : जे नक्षलवादी आहेत त्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात यावं. जे नाही करणार त्यांना सुरक्षा दलाशी सामना करावा लागेल. शस्त्राच्या बळावर आदिवासींचा विकास रोखू शकत नाही. तुम्ही शस्त्रे टाका आणि मुख्य प्रवाहात या असे आवाहन करत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुढच्या चैत्र नवरात्रीपर्यंत बस्तरमधील लाल दहशत संपवून टाकू असा इशारा शनिवारी दिला. दंतेवाडा येथील बस्तर पंडुम महोत्सवाच्या समारोपात ते बोलत होते.

यावेळी अमित शाह म्हणाले की, तो काळ गेला जेव्हा बस्तरमध्ये गोळ्या चालत होत्या. बॉम्बस्फोट व्हायचे. मी पुन्हा आवाहन करतोय, ज्यांच्या हातात शस्त्रे आहेत आणि ज्यांच्या हाती शस्त्रे नाहीत त्यांनाही..तुम्ही शस्त्रे टाका आणि मुख्य प्रवाहात या. तुम्ही आमचेच आहात. जेव्हा कधी नक्षली मारले जातात तेव्हा कुणाला आनंद होत नाही. परंतु परिसराचा विकास करायचा आहे जो मागील ५० वर्षात झाला नाही. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५ वर्षात बस्तरला सर्व काही देतील. विकास प्रक्रियेचा भाग बनणाऱ्या आत्मसमर्पण करणाऱ्या अतिरेक्यांना केंद्र आणि राज्य सरकारांकडून पूर्ण सुरक्षा मिळेल. ‘या भागाला विकासाची गरज आहे. मात्र, जेव्हा मुले शाळेत जातील, तालुक्यात आरोग्य सुविधा असतील, तेव्हाच हे शक्य आहे. प्रत्येकाकडे आधार कार्ड, रेशन कार्ड आणि आरोग्य विमा असला पाहिजे.असे त्यांनी सांगितले.तसेच बस्तरचा विकास तेव्हाच होईल जेव्हा इथे शांतता



येईल. मुले शाळेत जातील.गावागावात आरोग्य सुविधा उभ्या राहतील. प्रत्येकाकडे रेशन कार्ड,आधार कार्ड,आरोग्य कार्ड असेल.जेव्हा बस्तरचे लोक स्वतः आपलं घर,गाव नक्षलमुक्त करतील तेव्हाच हे शक्य आहे.कुणी कुणाला मारू इच्छित नाही. फक्त शस्त्रे सोडून विकासाच्या मुख्य प्रवाहात या. भारत सरकार आणि छत्तीसगड सरकार मिळून तुम्हाला सुरक्षा देईल. तुम्ही आदिवासी बांधवांचा विकास रोखू शकत नाही. विकासाच्या प्रक्रियेचा तुम्ही भाग व्हा असे अमित शाह यांनी म्हटले.

## छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण ११ एप्रिल रोजी जाहीर होणार

छत्रपती संभाजीनगर /सुनील वैद्य
(दैनिक महाभारत )


ग्रामविकास विभाग महाराष्ट्र राज्य आणि राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील सरपंच पदाच्या आरक्षणाची तारीख ११एप्रिल २०२५ निश्चित करण्यात आली आहे.मौलाना आझाद संशोधन केंद्र, एन-१०, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे ११ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वा. होणार आहे.

एप्रिल २०२५ते मार्च २०३० या पाच वर्षांसाठी एकूण ११५ ग्रामपंचायतीसाठी होणार आहे. सरपंच आणि उपसरपंच निवडणूक नियम १९६४ च्या नियम (३) (४) नुसार हे आरक्षण काढण्यात येणार आहे.तालुक्यातील सर्व नागरिकांनी या जाहीर प्रकटनाद्वारे सरपंच पदाचे आरक्षण काढण्यासाठी वरील ठिकाणी, तारखेला आणि ठरलेल्या वेळेत सभागृहात उपस्थित राहावे. असे आवाहन तहसीलदार छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांचे निधन

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

धनगर गल्ली येथील रहिवासी तथा गेवराई तालुक्यातील जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांचे शनिवार रोजी सायंकाळी ५. ३० वाजता वृध्दपकाळाने निधन झाले.



मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्ष होते .त्याच्यावर रविवार रोजी सकाळी ९ वा शहरातील मोमीनपुरा येथील कब्रस्तानमध्ये दफनविधी करण्यात येणार आहे.त्याच्या पश्चात तीन मुले,दोन मुली, सुना,जावाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.काझी हयातुल्ला यांनी विविध वृत्तपत्रात पत्रकार म्हणून काम केले होते.पत्रकार काझी अमान यांचे ते वडिल होते .

# मशिदीतील स्फोट प्रकरण:दोघांवर दहशतवादविरोधी कायदा ;रिमोटद्वारे घडवला मशिदीत स्फोट

बीड / प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथे मशिदीत झालेल्या स्फोट प्रकरणातपोलिसांकडून दोन आरोपींविरुद्ध यूएपीएहा दहशतवादविरोधी कायदा लावण्यातआला आहे. आता यूएपीए लागूझाल्यामुळे हा तपास डीवायएसपीदर्जाच्या अधिकाऱ्यांकडे जाणार आहे.दरम्यान, दोन्ही आरोपींना शनिवारीन्यायालयासमोर हजर केले असता विशेषसत्र न्यायाधीश व्यंकटेश पाटवदकर यांनी९ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.बीडच्या इतिहासात पहिल्यांदाच यूएपीएहा दहशतवादविरोधी कायदा एखाद्यागुन्ह्यात लागू झाला आहे, अशी माहितीबीडच्या स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिसनिरीक्षक उस्मान शेख यांनी दिली.

गेवराई तालुक्यातील अर्धमसलागावात २९ मार्च रोजी रात्री संदलमिरवणुकीत झालेल्या भांडणाच्यारागातून गावातील विजय रामा गव्हाणे वश्रीराम अशोक सागडे या दोघांनीगावातील मशिदीत खड्डा खोदूनजिलेटिनच्या कांड्या ठेवत रिमोटच्यामाध्यमातून पहाटे तीन वाजता स्फोटघडवला होता. गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावातील याच मशिदीत गावातीलदोन आरोपांनी जिलेटिन कांड्या पेरून स्फोट घडवून आणला होता.

आरोपीच्या घरातूनपेनड्राइव्ह, रिमोट जप्त

अर्धमसला येथील मशिदीत २९ मार्चरोजी पहाटे तीन वाजता स्फोट घडवूनआणण्यासाठी दोन्ही आरोपींनी मशिदीतएक खड्डा खोदून जिलेटिनच्या कांड्यापेरल्या होत्या. त्यानंतर २०० फूटअंतरावर जाऊन मारुती मंदिराच्यासमोरून रिमोटद्वारे स्फोट घडवूनआणला होता.

गुन्ह्याचा तपास गेवराई पोलिस उपअधीक्षकांकडे वर्ग

अर्धमसला गावातील मशिदीमधीलस्फोटाप्रकरणी अटक करण्यात आलेलेविजय गव्हाणे व श्रीराम सागडे याआरोपींची पोलिस कोठडी संपल्यानंतरशनिवारी बीडच्या स्थानिक गुन्हाशाखेच्या पोलिसांनी विशेष सत्रन्यायाधीश व्यंकटेश पाटवदकरयांच्यासमोर सायंकाळी पाच वाजताआरोपींना हजर केले. न्यायाधीशांनी ९एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावलीअसून दोन्ही आरोपींची तलवाडा पोलिसठाण्याच्या कोठडीत रवानगी केली आहे.या गुन्ह्याचा तपास आता स्थानिक गुन्हाशाखेकडून गेवराई पोलिसउपअधीक्षकांकडे वर्ग करण्यात आलाआहे.

दहशतवाद विरोधीकलम का वाढवले?

अर्धमसला मशिदीमधील स्फोटाचे हेकृत्य दहशतवादी असून या घटनेमुळेसर्वसामान्य जनतेत भीती निर्माण झालीहोती. अशा दहशतवादी कृत्यास प्रतिबंधकरण्यासाठी भारतीय न्याय संहितेचेकलम ११३ व बेकायदेशीर कृत्यप्रतिबंधक अधिनियम (यूएपीए ) १९६७चे कलम १५,१६,१८ अन्वये अशी दोनकलमे या गुन्ह्यात वाढवण्यात आले.



# डॉ.लकडावालांच्या शिबीरातून गरीबांना मोफत उपचार तर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या मुलांना प्रेरणा आणि मार्गदर्शन मिळेल - वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

## कोल्हापूर वैद्यकीय महाविद्यालय आणि सीपीआर यांच्या संयुक्तविद्यमाने मोफत लॅप्रोस्कॉपी शस्त्रक्रिया शिबाराचे आयोजन...

कोल्हापूर / प्रकाश कांबरे
(दै.महाभारत)

कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर यांच्यावतीने आयोजित डॉ.मुफज्जल लकडावाला यांच्या मोफत लॅप्रोस्कॉपी शस्त्रक्रिया शिबीरातून गरीब गरजू रूग्णांना मोफत उपचार मिळतील तसेच या ठिकाणी सेवा देत असलेल्या डॉक्टरांना अनुभव, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या मुलांना प्रेरणा आणि मार्गदर्शन मिळेल असे प्रतिपादन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. मंत्री श्री. मुश्रीफ यांच्या पुढाकारातून छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रूग्णालयात प्रसिद्ध लॅप्रोस्कॉपी तज्ज्ञ डॉ.मुफज्जल लकडावाला यांच्या सहाय्याने दोन दिवशीय मोफत शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन केले आहे त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले, पित्ताशय तसेच गर्भाशय पिशवी काढणे, हार्निया अशा वेगवेगळ्या शस्त्रक्रिया होणार आहेत. याचबरोबर गुडघ्या वरील शस्त्रक्रियाही होणार आहेत. सर्व शस्त्रक्रिया यंत्राद्वारे बिनटाक्याच्या सहाय्याने होणार असून मिरेल कंपनीने यासाठी आवश्यक साहित्य पुरविले आहे. पाच ते सहा लाखांपर्यंत खर्च येणाऱ्या शस्त्रक्रिया समाजसेवेच्या भावनेतून डॉ.लकडावाला याठिकाणी मोफत करीत आहेत. यातून त्यांना गरीबांचा नक्कीच आशिर्वाद लाभेल. तसेच विद्यार्थ्यांनाही ते याठिकाणी चांगल्याप्रकारे तयार करतील. त्यांनी यावेळी सोबत असणाऱ्या २२ तज्ज्ञ डॉक्टरांचेही आभार मानले.

या उद्घाटन प्रसंगी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचेसह महापालिका आयुक्त के.मंजुलक्ष्मी, लॅप्रोस्कोपी सर्जन डॉ.मुफज्जल लकडावाला, संचालक डॉ. अजय चंदनवाले, अधिष्ठाता डॉ.सत्यवान मोरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुप्रिया देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरूद्ध पिंपळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.शिशीर मिरगुंडे, डॉ.वसंत देशमुख, डॉ.उज्ज्वला खैरमोडे, डॉ.भास्कर मुर्ती, डॉ.इब्राहिम अन्सारी यांचेसह वैद्यकीय अध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री हसन मुश्रीफ यांनी डॉ.लकडावाला यांच्या समाजसेवाला




खरं तर पद्मविभूषण, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करायला हवे असे सांगितले. त्यांचा अनुभव लक्षात घेवून त्यांना आपला दवाखाना दाखवा, शेंडा पार्क येथील सुविधा दाखवा व आवश्यक सुधारणांबाबत मार्गदर्शन त्यांचे मार्गदर्शन घ्या अशा सूचना अधिष्ठाता डॉ.सत्यवान मोरे यांना दिल्या. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गरीबांची मुलं शिक्षण घेत असतात, त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून तज्ञ, अनुभवी डॉक्टर तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन मिळावे यासाठी समिती नेमल्याचे सांगून त्यांनी भविष्यात सर्व शासकीय महाविद्यालयांमध्ये तज्ज्ञ डॉक्टर येण्यासाठी आवश्यक खर्चही करण्यात येईल व सर्व प्रकारच्या मोठमोठ्या शस्त्रक्रिया करण्यासाठी नियोजन करणार असल्याची ग्वाही यावेळी दिली. महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत योजना खाजगी दवाखान्यांनी लागू करून घ्यावी. पब्लिक ट्रस्ट असणाऱ्या दवाखान्यांनी तर ही योजना सुरू करणे आवश्यक असून यातून गरजूंना विनाअडथळा सेवा देता येईल असे सांगितले.

# उन्हाळी पदार्थ कुरडई, पापड, शेवयांना मागणी..

माहूर (दै.महाभारत)

सध्या उन्हाळा सुरू असल्याने ग्रहिणी उन्हाळी पदार्थ करण्यात मगन आहेत. अंगणामध्ये टेरेसवर व छपरावर उन्हाळी वाळवणाची तयारी करत आहे. सध्या नोकरदार महिलांना उन्हाळी पदार्थ करण्यास वेळ मिळत नसल्याने अशा महिला उन्हाळी पदार्थ विकत घेत असल्याचे चित्र दिसत आहे. काही होशी नौकरदार महिला सुट्टीच्या दिवशीही उन्हाळी पदार्थ करण्याची होस पूर्वत आहेत. कुरवडी, पापड आलूचिप्स शेवया त्याचबरोबर उपवासाला लागणारे पदार्थ म्हणजे बटाट्याचे चिप किस बटाटा आणि साबुदाण्याची चकली व पापड तयार केले जात असून बटाट्याच्या मागणीत ही मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसत आहे.

ज्वारी तांदळाच्या पापडच्या बाजरीच्या खोरवड्या.

कुरडी जवारी तांदळाच्या पापड्या बाजरीच्या फार वड्या तयार करण्याचे प्रमाणात वाढ झाली आहे. हे पदार्थ तयार करून वाळवून ठेवल्यानंतर प्रत्येक महिने चांगले राहतात आणि



वर्षभर उपयोगी पडतात उन्हाळ्यामध्ये पापड कुरडई केल्यामुळे सणांमध्ये पुरणपोळीचे ताट भरगच्च दिसते.

अनेक पदार्थ विकत घेण्यावर भर आरोग्यासाठी आणि चवीसाठी हे करोडी पापड पदार्थ बाहेर मिळणारे जमपुर पेक्षा आरोग्यास चांगले असतात नोकरदार महिलांना उन्हाळी पदार्थ घरी बनवणे शक्य नसते त्यामुळे या महिला सुट्टीच्या दिवशी मदतनीस घेऊन हे पदार्थ बनवतात मात्र अनेक नोकरदार महिला या पापड आधी पदार्थ विकत घेण्याकडे कल वाढलेला दिसत आहे.

शेवळ्या झाल्या लुप्त

उन्हाळी पदार्थासाठी लागणाऱ्या साहित्याच्या दरात दहा टक्के वाढ झाल्याने यंदा तयार होणाऱ्या उन्हाळी पदार्थाच्या दरात वाढ झाल्याचे चित्र आहे. पाटावरच्या शेवळ्या झाल्या लुप्त पाटावरच्या शेवया ही आरोग्यास चांगल्या आहेत लग्नसराई महिलावर्ग शेवया करण्यात मगन असतात पण कलांतराने पाटावरच्या शेवळय कालबाह्य झाल्याचे दिसून येत आहे पूर्वी घरोघरी गावाची सुजी काढून पाठ मांडून पाटावरच्या शेवळ्या महिला करत होत्या पण सध्याच्या यांत्रिकरणाच्या युगात झटपट शेवया मिळत असल्याने पाटावरच्या शेवया लूपत झाल्याचे दिसत आहे.

# आमदार राहुल आवाडे यांच्या हस्ते पाच नवीन बसेसचे लोकार्पण

इचलकरंजी/संभाजी गुरव
(दै.महाभारत)

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व राज्य शासनाकडे आमदार राहुल आवाडे यांनी केलेल्या पाठपुराव्यातून येथील श्री शिवतीर्थ इचलकरंजी मध्यवर्ती बसस्थानकात नव्याने पाच अत्याधुनिक सुविधा असलेल्या एस.टी.बसेस दाखल झाल्या आहेत. या बसेसचा लोकार्पण सोहळा शनिवारी आमदार राहुल आवाडे यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी माजी आमदार सुरेश हाळवणकर यांची उपस्थिती होती.

इचलकरंजी हे हातकणंगले तालुका, आसपासचा परिसर आणि नजीकच्या सीमावर्ती भागासाठी मध्यवर्ती ठिकाण आहे. येथील बसस्थानकाच्या माध्यमातून शासनाला मोठ्या प्रमाणात महसुल मिळतो. परंतु याठिकाणी सध्या असलेली दळणवळण यंत्रणा ही अपुरी पडत होती. त्यासाठी इचलकरंजी बसस्थानकात नवीन बसेसची गरज निर्माण झाली होती. या संदर्भात इचलकरंजी आगाराकडून आमदार राहुल आवाडे यांच्याकडे शासन दरबारी पाठपुराव्यासाठी विनंती करण्यात आली होती. त्या अनुषंगाने आमदार राहुल आवाडे यांनी केलेल्या पाठपुराव्यातून नवीन ५ बसेस दाखल झाल्या आहेत. या नवीन बसेस लांब पल्ल्याच्या मार्गावर धावणार आहेत. संपूर्ण अत्याधुनिक सुविधा व यंत्रणा असलेल्या या बसेसमुळे इचलकरंजी आगाराच्या वैभवातही भर पडली आहे.

येथील मध्यवर्ती बसस्थानकात आमदार राहुल आवाडे यांच्या हस्ते या बसेसचा लोकार्पण सोहळा पार पडला. यानंतर आमदार आवाडे यांच्यासह उपस्थिती अधिकारी व मान्यवरांनी या नवीन बसमधून शहरातून फेरफटका मारत या नवीन बसमध्ये असलेल्या सुविधांची माहिती जाणून घेतली.

याप्रसंगी विभागीय वाहतूक अधिकारी संतोष बोगरे, वाहतूक




अधिक्षक शिल्पा थोरात, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक सुहास चव्हाण, आगार व्यवस्थापक सागर पाटील, आनंदा दोपारे, संघटना प्रतिनिधी जावेद बागवान यांच्यासह प्रकाश दत्तवाडे, पै. अमृत भोसले, बाळासाहेब कलागते, शेखर शहा, नरसिंह पारीक, चंद्रकांत इंगवले, प्रशांत कांबळे, श्रीकांत टेके, संजय केंगार, राजू बोंद्रे, सपना भिसे, अर्चना कुडचे, सीमा कमते, शोभा कापसे, राजू पुजारी, सुखदेव माळकरी आदींसह बसस्थानकातील वाहक, चालक व कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शब्दावर आंदोलन मागे !

## निलंबन मागे घेतले जात नाही तोपर्यंत मागे हटणार नाही– रोहन गलांडे पाटील

केज/ नंदकुमार मोरे
(दै, महाभारत )

बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ आशोक थोरात यांचे निलंबन मागे घेण्यात यावे या मागणीसाठी ५ एप्रिल रोजी अत्मदहनाच्या इशाऱ्यांचे आंदोलन रोहन गलांडे यांनी २६ एप्रिल पर्यंत स्थगित केले आहे कारण सरकार निलंबन मागे घेण्यासाठी वेळ मागु करत आहे तसेच उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी २ एप्रिल रोजी सभेत बोलताना म्हटले की निलंबन मागे घेण्यात येईल त्यामुळे रोहन गलांडे पाटील यांनी ५ एप्रिल रोजीचा अत्मदहनाचे आंदोलन स्थगित करत केला आहे परंतु येणाऱ्या २६ एप्रिल पर्यंत निलंबन मागे घेतले नाही तर २६ एप्रिल रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह चिंचोली माळी येथे अत्मदहन करणार आहे असे सरकारला कळविण्यात येते तरी २६ एप्रिल रोजी माझे काही बरे वाईट झाले तर सरकार, प्रशासन जबाबदार राहील असे निवेदन रात्री १२ वाजता केज तहसीलदार, पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहे असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी काल रात्री १२ वाजता पोलीस प्रशासन चिंचोली माळी येथे रोहन गलांडे पाटील यांच्या घरी आले असता त्यांनी पोलिस प्रशासनाला व केज तहसीलदार यांना निवेद्वारे म्हटले आहे तरी डॉ आशोक थोरात यांचे निलंबन २६ एप्रिल पर्यंत स्थगित केले आहे परंतु निलंबन मागे घेतले जात नाही तोपर्यंत मागे हटणार नाही असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

# अंबाजोगाई भक्तनिवास न्यास पुणे च्या वतीने साडेपाच लाख रुपयांची अत्यावश्यक साहित्य उपकरणे भेट

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै.महाभारत)

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या फिजिओथेरपी व अक्युपेशनल थेरपी विभागासाठी श्री अंबेजोगाई भक्तनिवास न्यास पुणे च्या वतीने रक्कम रुपये साडेपाच लाख रुपयांची अत्यावश्यक साहित्य उपकरणे देणगी स्वरूपात देण्यात आली. आजपर्यंत अशा प्रकारची अद्ययावत उपकरणे प्रथमच रुग्णालयास मिळाली आहेत. यामुळे सुमारे ७० ते ८० रुग्णांना याचा लाभ रोज होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे , डॉ.बिराजदार , डॉ.लामतुरे तसेच श्री अंबेजोगाई भक्तनिवास न्यासाचे विश्वस्त रमेश भागवत , संजय जोशी व ऋषिकेश साने आणि ससून रुग्णालय पुणेचे समाजसेवा अधीक्षक डॉ.शंकर मुगावे व जगन्नाथ लडकत उपस्थित होते.



# केकतसारणी येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे भव्य आयोजन




केज / नंदकुमार मोरे
(दै.महाभारत)

केज तालुक्यातील केकतसारणी येथे रविवार दिनांक ०६ एप्रील ते दिनांक १२ एप्रिल २०२५ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.भागवत कथा प्रवक्त्या ह.भ.प. सौ.आशाताई राऊत लातूरकर यांच्या सुमधुर वाणीतून ही कथा संपन्न होणार आहे तसेच सप्ताहात ज्ञानेश्वरी पारायण,रामजन्मोत्सवा च्या निमित्ताने ह.भ.प.श्रीकृष्ण महाराज चवार यांच्या कीर्तनाचे आयोजन दिनांक ०६ एप्रिल रोजी रविवारी सकाळी १० ते १२ या वेळेत होणार आहे.या सोहळ्यामध्ये दैनंदिनकार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत पहाटे ४ ते ६ काकडा आरती,६ ते ७ विष्णु सहस्त्रनाम,७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण,१० ते १२ गाथा भजन, दुपारी १२ ते २ भोजन,व त्यानंतर २ ते ५ श्रीमद् भागवत कथा ५ ते ६ हरिपाठ आणि ९ ते ११ हरि किर्तन,११ ते ४ हरि जागर असा नित्यक्रम असणार आहे.या सप्ताहात ह.भ.प. सौ.आशाताई राऊत लातुरकर यांची श्रीमद्भागवत कथा प्रवचन होणार असून त्यामध्ये त्या ग्रंथातील विविध अध्यायांचे पठन प्रवचन करणार आहेत यामध्ये भगवान श्रीकृष्णाची लीला,भक्तीचा मार्ग आणिधर्माचा महिमा या वर प्रकाश टाकला जाणार आहे.या सोहळ्यामध्ये विविध भागातील नामवंत कीर्तनकार आणि प्रवचनकार सहभागी होणार आहेत.

सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे राम जन्मोत्सव उत्सव दि.६ एप्रिल २०२५,सकाळी १० वाजता ह.भ.प.श्रीकृष्ण महाराज चवार यांच्या उपस्थितीत होणार आहे.तसेच रविवारी रात्री ९ ते ११ ह.भ.प.महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री, सोमवार दिनांक ७ एप्रिल रोजी ह.भ.प.कु.जान्हवीताई देशमुख,मंगळवारी ह.भ.प.श्री.सुधाकर महाराज वाघ,बुधवारी ह.भ.प.श्री भालचंद्र महाराज झांजे,गुरुवारी ह.भ.प.श्री.महारुद्र महाराज खाडे,शुक्रवारी ह.भ.प.श्री अरुण महाराज आळंदीकर, शनिवारी ह.भ.प.दिपक महाराज मेटे,शनिवारी ह.भ.प.श्री प्रमोद महाराज पवार यांचे कीर्तन होईल.दि.१३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री यांचे भक्तिरस पुर्ण काल्याच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता होईल.तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या धार्मिक कार्यक्रमात सहभागी व्हावे

## बेधडक

### रामराज्य...!

भारतवंशीय प्रजेला नानाविध
संकटांनी पुरते घेरले आहे,
राज्यकर्ते मात्र आपल्याच
धुंदीत तल्लीन झाले आहे...!

प्रजा रहावी केंद्रस्थानी
विचार हवेत उरले आहेत,
म्हणून पुन्हा यावे 'रामराज्य' शब्द
सर्वांच्या ओठी आले आहेत..!!



–प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक – विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई – बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड – ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com ✻ टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# सरस्वती नदीतील विनापरवाना बांधकाम नागरिकांच्या सतर्कतेमुळे पाडले बंद

## पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केली पहाणी

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

परळी शहर ज्या नदीच्या काठावर वसले आहे त्या सरस्वती नदीत अतिक्रमण करण्यात येत असून नदी खोदून अर्ध्या नदीत भिंत बांधण्यासाठी अनधिकृत खोदकाम सुरू करण्यात येत आहे. सरस्वती नदी ही ६० फुट रूंदीची असताना याठिकाणी ती २० ते ३० फुट रूंदीचीच करण्यात येत होती. जुन्या गाव भागातील नागरिकांनी याबाबत झोपलेल्या नगर परिषद प्रशासनाला जागे केल्यामुळे बेकायदा बांधकाम बंद पाडण्यात आले आहे. यामुळे हे अतिक्रमण थांबवण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. दरम्यान शुक्रवारी (ता.४) पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सरस्वती नदीला भेट देऊन नदीपात्राचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आदेश दिले आहेत.



शहरातील आंबेवेस परिसरात सरस्वती नदीत अनधिकृतपणे बांधकाम करण्यासाठी नदीत खोदकाम सुरू करण्यात आले होते. हे काम अनधिकृतपणे सुरू असल्याचे परिसरातील नागरिकांना कळल्यानंतर त्यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक त्रिंबक कांबळे व उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांना तात्काळ माहीती दिली. माहीती दिल्यानंतरही दिवसभर नदीपात्रात खोदकाम सुरुच होते. नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिवसभर चालु असलेल्या कामाकडे दुर्लक्ष केले. सामाजिक कार्यकर्ते अश्विन मोगरकर यांनी याबाबत परिसरातील युवकांना सोबत घेत घटणास्थळ गाठले. त्यानंतर मुख्याधिकारी सायंकाळ च्या सुमारास खोदकाम असलेल्या ठिकाणी लवाजम्यासह भेट देऊन चालु असलेले काम बंद पाडले. नदीपात्रात तीन जेसीबीच्या सहाय्याने चालु असलेले खोदकाम बंद करण्यात आले. परंतु नगर परिषद प्रशासना समोरुन तीन्ही जेसीबी व बांधकामसाठी आलेले मजुर तेथुन पसार झाले. परंतु नगर परिषद प्रशासनाने कोणावरही कारवाई केली नाही. जेसीबी ताब्यात घेतल्या नाहीत. शिवाय नदीपात्रात खोदकाम कोण करीत होते याचीही चौकशी केली नाही. सरस्वती नदीला मागच्या वर्षी पावसाळ्यात अशा अनधिकृत बांधकामांमुळे मोठा पुर येवून आंबेवेस व बरकतनगर परिसरातील अनेक घरांत पाणी घुसल्याने मोठे नुकसान झाले होते पण अद्यापही एकाही अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली नाही. उलट आंबेवेस परिसरात चक्क सरस्वती नदीत अतिक्रमण करण्यात येत आहे. या अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी परिसरातील रहिवाशांनी केली आहे.

यासंदर्भात मुख्याधिकारी त्रिंबक यांनी सांगितले की, नदीचे पात्र ५० ते ६० फुट असून या नदीचे लवकरच खोलीकरण करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आज जे कोणी या नदीवर अतिक्रमण करत आहे त्यांची माहिती घेऊन अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

जुन्या गाव भागातील रहिवासी भाजपचे युवा नेते अश्विन मोगरकर म्हणाले की, गावभागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीपात्रात चक्क सकाळपासून खोदकाम सुरू होते. नगरपरिषद प्रशासनाला तात्काळ कळवले मात्र अधिकारी सायंकाळी तिथे आले. मागच्याच पावसाळ्यात नदीला पूर येऊन पाणी अंबेवेस, गंगासागर नगर, बरकत नगर भागात घुसले होते. नदीपात्रात बांधकाम झाले तर गावभागात महापूर येऊन हाहाकार माजू शकतो.

# उल्हासनदीतील जलपर्णी पासून बनवणार शोभेच्या वस्तू

## ' वीड टू वेल्थ,प्रकल्प, महिला बचतगटांना विशेष प्रशिक्षण ?

कल्याण / संजय कांबळे
(दै.महाभारत)

उल्हास नदीचे प्रदूषण आणि पात्रातील जलपर्णी बाबतीत पत्रकार संजय कांबळे यांनी विविध वृत्तपत्रातून सचित्र वृत्त प्रसिद्ध केले होते, याची दखल ठाणे जिल्हा परिषदेचे कर्तव्यनिष्ठ ,डँशिग मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रोहन घुगे यांनी घेऊन उल्हास नदीची पाहणी केली होती, यानंतर तात्काळ वाढलेली जलपर्णी काढून, वीड टू वेल्थ,प्रकल्पाच्या माध्यमातून काढलेल्या जलपर्णीपासून शोभेच्या वस्तू बनविण्याचे जिल्हा परिषद प्रशासनाने निश्चित केले आहे, यासाठी महिला बचत गटांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे, यामुळे त्यांना देखील उत्पन्न मिळणार आहे,

त्यामुळे जिल्हा परिषदेचा हा निर्णय खरेच यशस्वी झाल्यास ऐतिहासिक ठरणार आहे.महाराष्ट्रात५५नद्या प्रदूषणात ठाणे जिल्ह्यातील उल्हास नदी सर्वात टाँपवर असून तिचे पात्र जलपर्णीने व्यापलेले आहे, अशा मथळ्याखाली पत्रकार संजय कांबळे यांनी वृत्त विविध वृतप्रत्रातून प्रसिद्ध केले होते, याची दखल, संवेदनशील, कर्तव्यनिष्ठ, डँशिग मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रोहन घुगे यांनी घेऊन लगेचच उल्हास नदीची पाहणी केली होती, पाहणी नंतर तात्काळ त्यांनी कृती करायला सुरुवात केली, याचाच एक भाग म्हणून जिल्हा प्रशासनाने वीड टू वेल्थ, या प्रकल्पाअंतर्गत, वाढलेली



जलपर्णी काढून तिच्या पासून शोभेच्या वस्तू बनविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. याबाबत विशेष प्रशिक्षण महिला बचत गटांना देण्यात येणार असून हे या कामकाजातून बचत गटांना उत्पन्न मिळणार आहे.

एकटच्या कल्याण तालुक्यात सुमारे१७१०बचत गट आहेत, तर ठाणे जिल्ह्यात जवळपास८हजार५००च्या आसपास आहेत, त्यामुळे जिल्हा परिषदेचा हा क्रांतिकारी प्रकल्प यशस्वी झाल्यास तो संपूर्ण महाराष्ट्रात ऐतिहासिक ठरु शकतो, याचे सर्व श्रेय मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रोहन घुगे यांना द्यावे लागेल, शिवाय उल्हास नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेले लाखो नागरिक, जलचर, मासे यांचे जीवन वाचू शकते.

दरम्यान आज प्रदूषण नियंत्रण मंडळाचे श्री कुलकर्णी यांनी उल्हास नदीस भेट देऊन नदीचे पाणी तपासण्या करिता पाणी नमुने घेतले आहेत. त्याचा अहवाल लवकर प्राप्त होईल.हे काही असले तरी जिल्हा परिषदेच्या या निर्णयाचे तमाम जनतेकडून स्वागत व्हायला हवे,

# पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न: डॉ. बाबासाहेब भगत

या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आमचे सहकारी मित्र सर्वश्री. डॉ .सुरज गि-हे, प्रा. रामचंद्र हंडाळ, डॉ. प्रा. बाबासाहेब वसंतराव भगत (सहाय्यक प्राध्यापक, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील फार्मसी कॉलेज, विळद घाट, अहमदनगर) डॉ. विनोद भोईटे, प्रा. राजेंद्र कळमकर आणि प्रा. व्ही. बी. फलके यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

प्रकाशन सोहळा प्रसंगी डॉक्टर बाबासाहेब भगत यांनी प्राध्यापक सुभाष देशमुख यांचे ग्रामीण भागातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करताना म्हणाले कासार पिंपळगाव येथील स्वर्गीय दादा पाटील राजळे शिक्षण संस्थेचे- दादा पाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालयात गेले ३३ वर्षे कार्यरत असणारे अर्थशास्त्र विभाग व वाणिज्य शाखा प्रमुख तसेच अर्थशास्त्राचे अभ्यासक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संशोधक मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली २ विद्यार्थीनींनी एम फिल. अवॉर्ड झालेल्या आहेत.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पीएच.डी. करिता बहिस्थ परीक्षक म्हणून काम पाहतात. त्यांनी राज्यस्तरीय चर्चासत्रे आणि परिषदांमधून तज्ञ मार्गदर्शक म्हणून तसेच अनेक सेशनचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. एक उत्कृष्ट वक्ता व व्याख्याता म्हणून त्यांचा सर्वत्र नावलौकिक आहे. त्यांनी आजपर्यंत ८३ संशोधन लेख तसेच ७ पुस्तकांचे लेखक म्हणून काम पाहिलेले असून त्यांच्या नावावर ३ पेटंट आहेत.



त्यांना ग्रामपातळी, विद्यापीठस्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रसंगांनी १५ पुरस्कार प्राप्त आहेत. १५ फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, तर ७ मोठ्या स्तरावरील कार्यक्रमांचे त्यांनी आयोजन केलेले आहे. महाविद्यालय स्तरावर विविध समित्यांमार्फत काम केलेले आहे. जर्नल रेव्ह्यू कमिटी मेंबर म्हणून काम पाहिलेले आहे. डव्हायझरी मेंबर म्हणून काम पाहिलेले आहे. सन २००६ पासून आजपर्यंत प्रत्येक प्रजासत्ताक दिनाला 'माजी सैनिकांचा सन्मान सोहळा' महाविद्यालय स्तरावर आयोजित करतात. त्यांच्या महाविद्यालयीन सेवेत त्यांनी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून अनेकांना कौन्सिलिंग केलेले आहे. त्यांचे अनेक माजी विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावरआयात-निर्यातक्षम शेती उत्पादन करतात. काही विद्यार्थी शासकीय, निमशासकीय तसेच सहकारी क्षेत्रात किंवा सेवेत कार्यरत आहेत. त्यांचे अनेक विद्यार्थी विविध शाळा व महाविद्यालयांमधून शिपाई, प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचर, क्लार्क ,शिक्षक, पर्यवेक्षक, मुख्याध्यापक आणि सहाय्यक पदावर कार्यरत आहेत. तसेच काही विद्यार्थी विविध ग्रामपंचायत सरपंच, सदस्य आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटयांचे तसेच शिक्षक बँक व विविध पतसंस्थांमधून शाखाधिकारी,चेअरमन तसेच सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे काही विद्यार्थी सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठात दोन विद्यार्थी पीएच.डी.चे संशोधनाचे काम करत आहेत. त्यांनी आपले शिक्षण अतिशय खडतर परिस्थितीत केलेले आहे. आमचे सर एम.ए (अर्थशास्त्र आणि मराठी), बी .एड.(मराठी व इतिहास मेथडसह) ; एम.फील (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक- द्वारा केंद्र अहमदनगर, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे- न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर अंतर्गत 'पाथर्डी तालुक्यातील नोंदणीकृत देवस्थानांचे पायाभूत सुविधा विकासातील योगदान') ; पीएच. डी. (पुणे विद्यापीठ पुणे, गणेश खिंड पुणे द्वारा केंद्र डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे- आबासाहेब गरवारे महाविद्यालय पुणे अंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांचे पायाभूत सुविधा आर्थिक व सामाजिक परिसेवा विकासातील योगदान); डी. एस. एम. (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक द्वारा केंद्र पार्थ विद्या प्रसारक समाजाचे- बाबूजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी, अहमदनगर); एम. एस. सी. आय. टी. यासह शिक्षण पूर्ण केलेले आहेत.

अशा या गुरुवारी यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या पुस्तकाचे प्रकाशन करताना मला मनस्वी आनंद होत आहे. या कार्याकरिता आमचे विद्यार्थी- प्रियशिक्षक परिसरात सुपरिचित आहेत. त्यांना परिसरातून अनेक माजी विद्यार्थी, पालक-शिक्षक, नागरिक, माता-भगिनींनी कौतुक व अभिनंदन केले.

त्यांना या कार्यासाठी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय आप्पासाहेब राजळे, शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाच्या आमदार मोनिकाताई राजळे, शिक्षण संस्थेचे सचिव श्री रवींद्र महाजन, मा. श्रीकांत मिसाळ, सहकारी मित्र आदरणीय प्राचार्य डॉ. राजधर टेमकर, कार्यालय अधीक्षक श्री विक्रमराव राजळे, डॉ.दशरथ दळवे तसेच कला शाखाप्रमुख डॉ .महेबूब तांबोळी, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. जनार्दन नेहुल तसेच संगणक शाखाप्रमुख प्रा. चंद्रकांत पानसरे, प्राचार्य सुनील पानखडे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर स्टाफने प्रेरणा दिली.


# इचलकरंजीत महावीरजन्म कल्याणकमहोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

इचलकरंजी/संभाजी गुरव
(दै.महाभारत)

येथील भगवानमहावीरजयंतीउत्सव मंडळ, सकल जैन समाज इचलकरंजीच्या वतीने भगवानमहावीर२६२४ वा जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त येत्या रविवार ३० मार्च २०२५ पासून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवातील मुख्य कार्यक्रम १० एप्रिलरोजी होणार असल्याची माहिती उत्सव मंडळाचे कार्याध्यक्ष चंद्रकांत पाटील व सचिव उदय चौगुले यांनी दिली.

सकल जैन समाजाच्या वतीने एकत्रितपणे भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव साजरा करणेची वेगळी परंपरा इचलकरंजी शहरांनी जपली आहे. या परंपरेला यावर्षी ५० वर्षे पूर्ण होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.इचलकरंजी शहरात देशातील विविध भागातील जैन समाज स्थायिक झाला आहे. येथे समस्त जैन समाजाच्या वतीने व सर्व पंथिय मंदीर कमेटींच्या वतीने एकत्रितपणे भगवानमहावीरजन्म कल्याणक महोत्सव साजरा करण्यात येतो. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार ३० मार्च रोजी दुपारी ३ वाजता मुनीश्री १०८ विशाल सागर जी महाराज, मुनीश्री १०८ जवळ सागर जी महाराज व मुनीश्री, १०८ उत्कृष्ट सागरजी महाराज यांच्या सानिध्यामध्ये मोटिवेशनल सेशन होणार आहे. याचबरोबर एक एप्रिल रोजी रक्तदान शिबिर, २ एप्रिल ला प्रश्नमंजुषा वर आधारित चलो बनेंगे धर्मज्ञानी स्पर्धा, ३ एप्रिल रोजी जैन धर्मीय प्रश्नमंजुषा स्पर्धा ४ एप्रिल रोजी पाककला स्पर्धा, ५ एप्रिल ला अष्ट द्रव्य थाळी सजावट स्पर्धा, ६ एप्रिल रोजी ट्रेजर हंट ऑन व्हील स्पर्धा आणि रक्तदान शिबिर तर सायंकाळी जैन भजन स्पर्धा होणार आहेत. सोमवार ७ एप्रिल रोजी फ्लॉवर डेकोरेशन स्पर्धा, ८ एप्रिल रोजी भगवान महावीर सर्वकालीन समस्यांचे समाधान कर्ता या विषयावर मुनीश्री १०८ विद्यासागर महाराज यांचे प्रवचन तर ९ एप्रिल रोजी भगवान महावीर स्वामी के दिव्य संदेश का आज के जीवन मे महत्व या विषयावर प.पू. प्रज्ञाभारती सरस्वती श्रीजी यांचे प्रवचन होणार आहे. बुधवार ९ एप्रिल रोजी अष्ट द्रव्य थाळी सजावट स्पर्धा होतील.



गुरुवार १० एप्रिल रोजी मुख्य कार्यक्रम होणार आहे. आदिनाथ जैन मंदिर, गावभाग येथून प्रभात फेरी आयोजित केली आहे. हीफेरी गुजरी पेठ, कागवाडे मळा, राजवाडा चौक, शांतिनाथ मंदिर, थोरात चौक, बालाजी चौक, शाहू पुतळा मार्गे जैन बोर्डिंग येथीलचंद्रप्रभू जैन मंदिर येथे सकाळी ८ वाजता ध्वजारोहण होईल. या दिवशीदोन ठिकाणी रक्तदान शिबिर होणार आहे. सकाळी ९.३० वाजता बहुबली येथील वृद्धाश्रमास साहित्य वाटप तसेच टीबी क्लिनिक येथील रुग्णांना दूध व बिस्कीट वाटप करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता शिवतीर्थ जवळ असलेल्या आनंदगुरु चपाती भाजी सेवा केंद्र या ठिकाणी मिष्ठान भोजनाचे वाटप होईल. सायंकाळी ६ वाजता श्री १००८ भगवानमहावीररथोत्सव सुरू होईल. यावेळी देखावा स्पर्धा आयोजित करण्यात आलेला आहे. जैन धर्मीय विषयावर व समाज प्रबोधनात्मक देखाव्यावर ही स्पर्धा होईल. गावभाग येथील जैन मंदिर मधून सुरू होणारी ही मिरवणूक नामदेव मैदान या ठिकाणी आल्यानंतर बक्षिस वितरण व सत्कार समारंभाने कार्यक्रम विसर्जित होईल. या कार्यक्रमात श्रावक व श्राविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

# 'घिबली'च्या मोहजाळात अडकली आजची तरुणाई!

माहूर (दै.महाभारत)

सोशल मीडियावर व्हायरल घिबली एआय ट्रेनमुळे स्वतःला कंट्रन रूपात पायनाचा मोह तरुणाला आवरत नाहीत. मात्र या आकर्षण मागे डेटा सुरक्षा महापुरुषांचा अवमान असे गंभीर धोके असल्याचे सध्या समोर येत आहे. तालुक्यात याबाबत तीव्र चिंता व्यक्त होत आहे. त्यामुळे आजची तरुणाई या घिबली ट्रेनच्या मोहात चांगलीच अडकली असल्याचे दिसून येत आहे.



बुद्धिमत्ता च्या मदतीने स्वतःहून घिबली शाळेतील कार्टून बनवण्याचा ट्रेंड आला आहे. सोशल मीडियावर जिकडे पाहावे तिकडे हेच फोटो दिसत आहेत. सेलिब्रिटी पासून सामान्य वापरकर्त्यापर्यंत सर्वजण यात सामील झाले आहेत. स्वतःचे कुटुंबाचे फोटो मिम्स चित्रपट मालिका मधील दृश्य या शैलीत बदलून शेअर केले जात आहेत. मात्र या ट्रेनच्या लोकप्रिय ते सोबतच काही गंभीर चिंता ही व्यक्त होत आहेत. तरुणाई आपले काम धंदे सोडून या वेळ वाया घालत आहे.का? हे तंत्रज्ञान वापरण्यास सुरक्षित आहे का? यातून खाजगी डेटा लिक होण्याचा धोका नाही का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

या ट्रेंड मुळे अनेक महत्त्वाच्या समस्या कडे दुर्लक्ष होत असल्याचा सुरही उमटत आहे. खुद्द घिबली शैलिचे निर्माते हयाओ मियाझाकी यांनी अशा एआय केलेल्या मानवी जीवनाचा अपमान म्हटले असल्याची चर्चा आहे. जी या ट्रेंडच्या योग्य तेवर प्रश्नचिन्ह लावते . त्यामुळे जाणकार मंडळी तरुणाला या ट्रेनच्या आहारी न जाण्याचा आणि सजग राहण्याचा सल्ला देत आहेत.

# कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कामगार कल्याण अधिनियम १९५३ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करू

## जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचे आश्वासन

इचलकरंजी / संभाजी गुरव

महाराष्ट्र कामगार कल्याण अधिनियम १९५३ ची कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे ज्या आस्थापना, संस्था, शासकीय कार्यालये, हॉटेल्स, मॉल्स, कापड दुकाने, वाहतूक संस्था आदी. अशाप्रकारे या अधिनियमास अनुसरून पाच पेक्षा जास्त कामगार ज्या ठिकाणी काम करतात, त्यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या योजना व उपक्रमांचा लाभ मिळत नाही. ही बाब राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश केसरकर यांनी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या निदर्शनात आणून दिली. त्यास अनुसरून त्यांनी विशाल घोडके सहा. कामगार आयुक्त यांना, राज्याचे कामगार आयुक्त यांना त्वरीत पत्रव्यवहार करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी मुंबई, पुण्यातील एमआयडीसी मध्ये मिळणाऱ्या सोयी सुविधा कोल्हापुरातील कागल, गोकुळ शिरगाव, शिरोली, हातकणंगले एमआयडीसीत मिळण्यासाठी कामगार विभाग, एमआयडीसी, कौशल्य विकास विभाग आणि कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी या ठिकाणच्या रिक्त जागा व त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा आदी. सर्वसमावेशक माहितीवर आधारित आराखडा तयार करुन भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करावे, अशा सूचना देखील त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.१०० दिवसांचा कार्यालयीन सुधारणा विशेष, कामगार संघटनांच्या मोहिमे अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय व कामगार आयुक्त कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील कामगार संघटनांशी चर्चा सत्र व उद्योगाच्या अडचणींच्या निराकरणाबाबत कामगार संघटनांचे प्रतिनिधी व उद्योजकांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी कोल्हापूरचे सहाय्यक कामगार आयुक्त विशाल घोडके, इचलकरंजीच्या सहाय्यक कामगार आयुक्त जानकी भोईटे इतर वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्ह्यातील विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी व उद्योजक उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी कोल्हापूर जिल्हा बाल कामगार मुक्त करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करुया. जिल्ह्यात कोणत्याही ठिकाणी बालकामगार आढळल्यास याची माहिती सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयास कळवावी असे आवाहन करुन, जिल्ह्यातील उद्योगधंद्यात वाढ होण्याबरोबरच कामगारांचे कल्याण साधण्यासाठी कामगारांशी संबंधित जिल्हा पातळीवरील प्रश्न जिल्हा प्रशासन प्राधान्याने सोडवेल तसेच शासन स्तरावरील प्रश्न शासनाला सादर करण्यात येतील. विविध उद्योगांमध्ये



काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेला उद्योजकांनी प्राधान्य द्यावे असे सांगितले.कामगारांच्या सुरक्षिततेसाठी जनजागृतीपर शिबीरे, उद्योग क्षेत्रांच्या आवारात, एमआयडीसी परिसरात बचत गटांच्या माध्यमातून माफक दरात भोजन व्यवस्था, इंडस्ट्री ऑडिट, विमा, फायर सेफ्टी, कारखाने कंपन्यांमधील सुरक्षितता, कामगार व त्यांच्या मुलांचे आरोग्य, शिक्षण, रात्रीच्या वेळी परगावाहून येणाऱ्या कामगारांसाठी निवास व्यवस्था, उन्हाळ्यात अचानक आपत्ती ओढवू नये यासाठी खबरदारी, हजेरी पत्रक, पगार पत्रक, अंतर्गत रस्ते आदी. विषयांना अनुसरून जिल्हाधिकारी श्री. येडगे यांनी उद्योजक व कामगार प्रतिनिधींशी संवाद साधला.या बैठकीत कामगार संघटना प्रतिनिधीनी कामगारांना येणाऱ्या अडचणी मांडल्या. सहा. कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांना पूर्वी प्रमाणे तपासणीचे अधिकार, कंत्राटी कामगारांना किमान वेतन मिळावे, कामाचे तास निश्चित करावेत, भविष्य निर्वाह निधीचे लाभ मिळावेत. जिल्ह्यातील हॉस्पिटलमध्ये डॉक्टर, कर्मचारी यांची भरती व्हावी, यंत्रमाग कामगारांचे प्रश्न, साखर उद्योगातील कामगारांना शासनाच्या त्रिपक्षीय करारानुसार वेतन देण्याची मागणी अशा जिल्ह्यातील कामगार वर्गाशी गव संबंधित अनेक प्रश्नांना अनुसरून मते व्यक्त केली.त्यास अनुसरून जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी सर्वच बाबतीत सहकार्य केले जाईल, असे आश्वासन दिले.

# राजर्षी शाहू पतसंस्थेने शून्य टक्के एनपीएची कायम परंपरा राखली अहवाल सालात संस्थेला
## १ कोटी २५ लाख रुपयांचा नफा

शिरोळ ।आनंदा शिंगे
(दै.महाभारत)

राजर्षी शाहू नागरी सहकारी पतसंस्था कुरुंदवाड या संस्थेने चालू आर्थिक वर्षात शून्य टक्के एनपीए ची परंपरा कायम ठेवली असून अहवाल सालात १ कोटी २५ लाख रुपयाचा नफा मिळवला आहे सभासद ठेवीदार कामगार आणि संचालक मंडळाच्या अथक परिश्रमामुळे यश प्राप्त झाल्याची माहिती संस्थेचे चेअरमन रावसाहेब उगारे व व्हाईस चेअरमन महावीर पोमाजे ज्येष्ठ संचालक माजी नगराध्यक्ष दादासाहेब आप्पासो पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली



संस्थेच्या सांपत्तीक स्थितीबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले १०३ कोटी ८२ लाख रुपयांच्या ठेवी झाले आहेत तर ६२ कोटी ५१ लाख रुपयाचे कर्ज वितरित केले आहेत संस्थेचे भाग भांडवल २ कोटी ८६ लाख रुपये आहे स्वनिधी ९ कोटी २ लाख रुपये इतकी आहे गुंतवणूक ५२ कोटी ९३ लाख रुपये आहे खेळते भांडवल १२१ कोटी ५९ लाख रुपये आहे एनपीए शून्य टक्के आहे एकूण व्यवसाय १६६ कोटी ३३ लाख रुपयाचा झाला आहे निव्वळ नफा १ कोटी २५ लाख रुपयांचा झाला असून थकबाकीचे प्रमाण १. १५ टक्के इतके अल्पआहे असे माहिती सांगून ते म्हणाले एसएमएस बँकिंग नेट आरटीजीएस सुविधा प्राप्त आहेत ऑनलाईन कोर बँकिंग सेवा अल्प दरात लॉकर सुविधा उपलब्ध आहेत सतत ऑडिट वर्ग अ आहे सतत १२ टक्के लाभांश देण्याची परंपरा संस्थेने ठेवले आहे सर्व शाखा सीसी टीव्ही व अलार्म सुरक्षेने सज्ज आहेत संस्थेच्या मुख्य कार्यालयास सर्व शाखा स्व मालकीच्या इमारतीमध्ये आहेत हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते सोलर सिस्टिम बसून कामकाज चालू आहे असे सांगून ते म्हणाले सोने खरेदीसाठी चार कोटी रुपये दिले आहेत ९% दराने ऊसतोड मशीन ४ लाभार्थ्यांना देण्यात आले असून ३ कोटी ६० लाख रुपये कर्जे दिले आहेत १००पेक्षा अधिक टू व्हीलर गाड्यांसाठी तीन कोटी रुपये दिले आहेत ट्रॅक्टर याबरोबरच शेती कर्ज घर कर्ज व्यवसायासाठी आणि डंपर खरेदीसाठी लाभार्थींना सुमारे ३९ कोटी रुपये कर्ज वितरित करण्यात आले असल्याची माहिती ही त्यांनी सांगितले एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या युक्तीप्रमाणे संस्थेने एकमेकांना सहकार्याची भावना ठेवली असून यामध्ये संस्थेच्या सभासदांचा ठेवीदारांचा कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असून संचालक मंडळाचे योग्य मार्गदर्शन लाभत आहे असेही त्यांनी सांगितले यावेळी ज्येष्ठ संचालक जिनगोंडा पाटील अण्णासो गुदले सुषमा उपाध्ये धोंडीराम चौगुले माजी चेअरमन किरण आलासे दौलत कांबळे पद्मराणी पाटील धनपाल कोथळी विजयकुमार जोंग आयेषा बागवान यांच्यासह संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गज्जानवर आदी संचालक उपस्थित होते

# पाच निष्पाप लेकरांची घराबाहेरची तगमगती रात्र!

वाळूज / पांडुरंग गायकवाड
(दैनिक महाभारत)

छत्रपती संभाजीनगर – काही गोष्टींना शब्दच सापडत नाहीत. अशाच एका वेदनादायक आणि अंतर्मुख करणाऱ्या घटनेने शहरात हलचल माजवली आहे. दोन चुलत भावांनी त्यांच्या पत्नीशी पटत नसल्याने फारकत घेतली. संसार मोडला, पण पाच निष्पाप अपत्यं मात्र वडिलांच्याच संगतीने राहत होती. दोघेही वडील दारूच्या आहारी गेले आणि एक दिवस असं काही घडलं की घराच्या चार भिंती निष्पाप मुलांना कैद वाटू लागल्या.

किरकोळ कारणावरून दोघांपैकी एका वडिलांनी दारूच्या नशेत आपल्या मुलांवर राग व्यक्त केला. त्यांचे शब्द, त्यांची वागणूक इतकी असह्य झाली की वयाच्या अवघ्या ११ ते १६ वयोगटातील पाच लेकरं – तीन मुली आणि दोन मुलं – घर सोडून निघून गेली. या मुलांना जगाची शहाणपण तर नाही, पण मायेची ओढ होती. तीच ओढ शोधण्यासाठी त्यांनी घराचा रस्ता सोडला.

ही घटना उघडकीस आली तेव्हा ३८ वर्षीय वडिलांनी हसूल पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी आणि त्यांच्या चुलत भावाने एकमेकांकडे जाऊन शोध घेतला, पण कुठेही ही लेकरं सापडली नाहीत. अखेर पोलिसात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक राहुल निर्वळ आणि गणेश केदार यांनी तात्काळ तपास सुरू केला. त्यात पारध शिवार, भोकरदन तालुक्यात सर्व मुले मिळून आली आहेत.

ही पाचही मुलं पहिल्या रात्री हसूल परिसरातच भटकत राहिली. दुसरी रात्र त्यांनी रेल्वे स्थानकावर उपाशी, भुकेलेपणी काढली. नंतर भोकरदनमधील आईकडे पोहोचली. त्या काळजात चर्र करणाऱ्या रात्री त्यांच्या आयुष्यात काहीतरी कायमचं कोसळून गेलंय.या घटनेतून केवळ पोलिसांचं काम वाढलं नाही, तर समाजालाही आरसा दाखवणारी तीव्र वेदना मिळाली आहे. दारूच्या आहारी गेलेले वडील, हरवलेलं पालकत्त्व, आणि एकटेपणाच्या खाईत लोटलेली ही मुलं



– ही परिस्थिती केवळ काळजात थरकाप उडवणारी नाही, तर समाज म्हणून आपण कुठे कमी पडतोय याचं स्पष्ट उत्तरही आहे.पालकत्व म्हणजे केवळ जन्म देणं नाही, तर त्यांना मायेची, आधाराची सावली देणं असतं. आणि ती सावली जर त्रासदायक झाली, तर मुलं कुठं जातील? पोलिसांचा तपास सुरू आहे, डोळ्यातली भीती, आणि मनातली सल, त्यांना आयुष्यभर पाठ सोडणार नाही.

# पेवा ता.मंठा येथील ग्रामसेवकाला त्वरित निलंबित करा.विठ्ठल लाखुळे

**जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण**

जालना/प्रतिनिधी
(दै.महाभारत)

जालना जिल्हाधिकारी कार्यालय समोर दिनांक. ३१/२०२५ पासुन सर्व मुलाबाळासह विठ्ठल पांडुरंग लाखुळे आमरण उपोषणाला बसलेले आहेत. अद्याप पर्यंत माननीय जालना जिल्हाधिकारी यांनी कसल्याही प्रकारची दखल न घेतल्याने उपोषणकर्यात्यांनी नाराजीचा सूर दर्शवलेला आहे. मौजे पेवा तालुका मंठा जिल्हा जालना सर्व नंबर १५.गट नंबर ३९.५४.६९.९४ खंडपीठ छत्रपती संभाजीनगर निकाल दिल्यानुसार कोणतेही प्रकारचे खरेदी विक्री मज्जाव करण्यात आलेला आहे.सदर ठिकाणी ग्रामपंचायत मुळे कधीच्या ठिकाणी कसले प्रकाराचे बांधकाम परवानगी देण्यात येऊ नये अशी मुख्य मागणी आमरण उपोषण



करते विठ्ठल पांडुरंग लाखुळे यांनी माननीय जालना जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. काही लोक शेड पत्रे टाकून बांधकाम करीत आहे. सदर मिळवतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यात येऊ नये. असा अर्ज तलसीलदार मंठा व ग्रामसेवक पेवा तालुका मंठा जिल्हा जालना यांना दिला असता त्यांना केराची टोपली दाखवली आहे.सदर अधिकारी यांना त्वरित निलंबित करण्यात येऊन सदर ठिकाणाहुन त्वरित बदली करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. जालना जिल्हाधिकारी यांनी त्वरित लक्ष देऊन आमरण उपोषण करित असलेले विठ्ठल पांडुरंग लाखुळे यांना त्वरित न्याय देण्यात यावा. अशी मागणी उपोषण करित असलेल्या कुंटूंब,आंध, भिल्ल, पारधी आदिवासी समाज बांधव, केली आहे.

# एन. टी. सरांच्या एकलव्य स्टडी सर्कलची एन. एम. एम. एस परीक्षेत उत्तम कामगिरी

अंगद सुरोशे / हिमायतनगर
(दै.महाभारत)

कृष्णा गंगाधर वानखेडे जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आल्याने सर्व शिक्षक वर्गातून कौतुक होत आहे... नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यात एन.एम.एम.एस परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे त्यात ४५ विद्यार्थ्यांपैकी ३७ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. कृष्णा गंगाधर वानखेडे हा विद्यार्थी नांदेड जिल्ह्यातून प्रथम तर नांदेड जिल्ह्यातून ओबीसी प्रवर्गातून प्रसाद वच्चेवार हा प्रथम आला आहे यांचे सह अक्षरा माने, रिया वाठोरे, रिया पाळजकर, अविका कटकमवाड,नेहा गड्डमवार, खुशी वाडेकर, शिवांजली आरेपल्लू, गौरी वानखेडे, वैदेही गुंडेवार, वैष्णवी शिल्लेवाड, दिव्या पेंडकर, विराट कदम, क्षितिज वानखेडे, श्रेयश वानखेडे, धीरज



रणशूर, परमेश्वर आरेपल्लू, प्रथमेश हेंद्रे, शौर्य चिंतमवाड, यश तोटेवाड, यश कांबळे, रणजीत नाचारे, पार्थ बनसोडे, पायल बास्टेवाड, आरती कामलवाड, अनिकेत बुद्धेवाड, पौर्णिमा गड्डमवार, विशाल शिल्लेवाड,संकेत नारे, साईराज ढगे, विराज भोयर, अभय वानखेडे, आकांक्षा जेजेरवाड,अक्षरा कांबळे,अस्मिता कदम, गौरी गंदेवार हे सर्व विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत. या परीक्षेत पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावी पर्यंत प्रति वर्ष१२००० रुपये शिष्यवृत्ती मिळणार असल्याचे शेख सर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले याचे सर्व श्रेय विद्यार्थ्यांनी एकलव्य स्टडी सर्कलचे संचालक आदरणीय. एन. टी. जाधव सर, शेख सर तसेच भास्कर वाडेकर सर व कोंकेवाड सर यांना दिले आहे.

श्री शेख सर यांनी पत्रकारांशी बोलताना असे आवाहन केले आहे की केंद्र शासनामार्फत आर्थिक दुर्बल घटकांतील पाल्यांसाठी एन. एम .एम. एस परीक्षेचे आयोजन केले जाते. सदरील परीक्षा १८० गुणांची असून ती गणित,बुद्धिमत्ता विज्ञान व सामाजिक शास्त्र या विषयावर आधारित असते. या परीक्षेत १०० पेक्षा जास्त गुण मिळवणारे अनेक विद्यार्थी आतापर्यंत हिमायतनगर तालुक्यातून शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. आतापर्यंत एकलव्य स्टडी सर्कल चे २५० पेक्षा जास्त विद्यार्थी सदरील शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत इथून पुढे सुद्धा एकलव्य स्टडी सर्कलमध्ये यापेक्षाही जास्त विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरतील त्यासाठी वर्ग सातवीतून आठवीत जाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी या परीक्षेस बसावे आणि शासन देत असलेल्या आर्थिक लाभाचा फायदा घ्यावा असे आवाहन श्री एन.टी. जाधव सर व शेख सर यांनी विद्यार्थी व पालकांना केले आहे.

# मनसे व जागृती युवक मंडळाच्या वतीने सार्वजनिक पाणपोई सुरू

शिर्डी / संजय महाजन
(दै.महाभारत)

साईबाबांच्या पुण्य नगरित श्रीराम नवमी उस्तवात येणाऱ्या साई भक्तांची तहान भागवायला मनसे व जागृती युवक मंडळ च्या वतिने सार्वजनिक पाणपोई छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी चेअरमन गोपिनाथ गोंदकर, मनसेचे नगरसेवक दत्तात्रय कोते ,छोटे बापु दत्ता गोविंद कोते यांच्या शुभहस्ते श्रीफल वाढून सुरू करण्यात आली.




२००४ पासुन या चौकात अखंडित साई भक्तांची सेवा करणारे जागृती युवक मंडळ आहे .श्रीराम नवमी उस्तवात मोठ्या संखेत महाराष्ट्र राज्य भरातुन साई भक्त पाई पालख्या घेऊन येतात बाबांच्या नगरित पालखी प्रथम खंडोबा मंदिरात आणली जाते व मग साई समाधी मंदिरात नेली जाते त्या मुळेच या ठिकाणी साई भक्त भर ऊन्हात विवस्त्र पायाने येतात त्यांना थंड पाणी पाजुन आम्ही छोटीशी सेवा करतो आहे असे जागृतीचे सर्वे सर्वा मनसे नगरसेवक दत्तात्रय कोते यांनी यावेळेस सांगितले...

ही सेवा जागृतीचे सदस्य योगेश भोजणे,यश कोते, रावसाहेब देशमुख, कैलास भुजबळ,कुणाल सांबारे, प्रसाद देशमुख, साई सोनवने,ज्ञानेश्वर जगदाळे,दिपक शेलार, राहुल देशमुख, भिमा गाजरे ,राहुल गायकवाड, प्रशांत ठोंबरे, संपतराव हतांगळे, मिरा वर्मा, सुरेश सोनवणे, रूपेश देवकर ,सुनिल देशमुख,सचिन देशमुख आदी करत आहे.

# साईबाबा इंटरप्रायजेस व दर्शना इंटरप्रायजेस तर्फे श्री सुदर्शन होम चे आयोजन
## हजारो भाविकांनी घेतला तिर्थप्रसादाचा लाभ!

कल्याण / संजय कांबळे
(दै.महाभारत)

कल्याण डोंबिवली परिसरातील दातृत्व व्यक्ती महत्त्व म्हणून नावलौकिक मिळवलेले श्री मोहनशेठ(बाबा), सदाशिव शेठ,शेलार, अनिलशेठ शेलार,राकेश शेठ मोरे, प्रसाद शेठ मोरे यांच्या साईबाबा इंटरप्रायजेस तसेच दर्शना इंटरप्रायजेस यांच्या वतीने कांबा येथील साईबाबा स्टोन क्रेशर कंपनी येथे श्री सुदर्शन होम चे आयोजन करण्यात आले होते, यावेळी तीर्थ व महाप्रसादा निमित्ताने हजारो भाविक व गोरगरिबांनी अन्नदानाचा लाभ



घेतला.कल्याण तालुक्यात मोहनशेठ हे नाव माहिती नाही असा कोणी शोधून सापडणार नाही, त्यांच्या साईबाबा इंटरप्रायजेस तसेच दर्शना इंटरप्रायजेस या कंपनीच्या माध्यमातून गोरगरीब, कष्टकरी, मजूर, शेतमजूर आदिवासी बांधव यांना घरे, शाळा, शैक्षणिक साहित्य, मंदिरे, अशी अनेक प्रकारे मदत करण्यात येत असते, त्यांच्या मुळे आज शेकडो गोरगरिबांना रोजगार मिळाला आहे.इतकेच नव्हे तर, कल्याण सह, मुरबाड, शहापूर, तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटण्यात ही कंपनी आघाडीवर आहे,आज त्यांच्या वतीने साईबाबा स्टोन क्रेशर कार्यालयात श्री सुदर्शन होम चे आयोजन करण्यात आले होते, अगदी विधीवत, धार्मिक पध्दतीने होम झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते,यावेळी श्री मोहनशेठ(बाबा),सदाशिव शेठ शेलार, अनिल शेठ शेलार, राकेश शेठ मोरे, प्रसाद शेठ मोरे, कुंडलिक बनकरी पाटील,बाळा गायकर, योगेश बनकरी, बाका पावशे, छगन बनकरी,पत्रकार संजय कांबळे, आदी मान्यवर उपस्थित होते

# अतिक्रमण मुक्त करून सरस्वती व घनशी नदीचे पुनर्जीवन करुन
## सुशोभीकरण करण्यात यावे

मा.नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

पुरातन काळापासून प्रभु वैद्यनाथाचया पावन भुमीत असलेल्या व जुन्या गांव भागातुन वाहणाऱ्या सरस्वती व घनशी चे पुनर्जीवन करुन सुशोभीकरण करण्यात यावे व या नदीत झालेले अतिक्रमण काढून नद्यांचा श्वास मोकळा करण्यात यावा अशी मागणी नगर परिषदेचे मुख्याधिकारी व प्रशासक यांच्या कडे एका निवेदनाद्वारे मा.नगराध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया यांनी केली आहे.




केंद्र व राज्य शासनाकडून नद्यांचे पुनर्जीवन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मोहीम राबविण्यात येत आहे . अधिकाधिक नद्यांचे पुनर्जीवन, खोलीकरण, सपाटीकरण पात्र विस्तारित करणे आदि बाबिंना प्राधान्यक्रम देण्यात येत आहे.जास्तीत जास्त नद्या उपनद्या, ओढे,नाले प्रवाही करण्यावर केंद्र व राज्य शासनाकडून भर दिला जात असताना परळीत नद्यांचे स्वरुप मात्र अतिक्रमणाच्या विळख्यात सापडत आहे.या बाबींवर प्रशासक व मुख्याधिकारी यांनी तातडीने कारवाई करावी व पुरातन काळापासून असलेल्या या दोन्ही नद्यांचे पुनर्जीवन करुन सुशोभीकरण करण्यात यावे अशी मागणी लोहिया यांनी केली असुन याबाबत लवकरच पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे,जिल्हाधिकारी, यांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती लोहिया यांनी दिली आहे.,

# माधवनगर येथे स्वातंत्र्य सेनानी स्व. श्रीपाल काका आलासे अर्बन बॅंकेच्या
## २२ व्या शाखेची उद्घाटन

शिरोळ ।आनंद शिंगे
(दै.महाभारत)

सांगली जिल्ह्यातील माधवनगर तालुका मिरज येथे स्वा से कै श्रीपाल काका आला से कुरुंदवाड अर्बन बँकेच्या २२ व्या शाखेचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. आदिनाथ पतसंस्थेचे चेअरमन पोपटराव डोर्ले-यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. अध्यक्षस्थानी माधवनगर ग्रामपंचायतीच्या सरपंच अंजू शेखर तोरो होत्या.चेअरमन प्रदीप पाटील,संचालक इकबाल पटवेगार आदी प्रमुख उपस्थित होते.

कै. श्रीपाल काका आलासे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून फित कापून उदघाटन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. यावेळी बोलताना आदिनाथचे चेअरमन डोर्ले म्हणाले कुरुंदवाड अर्बन बँकेने सातत्याने



प्रगतीचा आणि विश्वासाचा आदर्श ठेवला आहे. बँकेची पारदर्शक कारभार पद्धत, शिस्तबद्ध सेवा आणि ग्राहकांशी असलेले प्रामाणिक नाते ही तिची खरी ताकद आहे. ग्रामीण व शहरी भागात आर्थिक सक्षमतेसाठी बँकेचे योगदान लक्षणीय आहे. सामाजिक बांधिलकी जपत ही बँक नवा आदर्श निर्माण करत असल्याचे सांगितले.यावेळी बोलताना चेअरमन पाटील म्हणाले अर्बन बँकेने विश्वास आणि गुणवत्तेच्या बळावर आजवरचा प्रवास घडवला आहे. माधवनगर येथील शाखा ही फक्त एक विस्तार नाही, तर सेवा आणि विकासाचा नवा टप्पा आहे.ही वाटचाल विश्वासाने पुढे जाईल अशी अपेक्षा व्यक्त करतो असे सांगितले.सूत्रसंचालन अजिंक्य चव्हाण यांनी केले तर आभार बँकेचे ज्येष्ठ संचालक महादेव धनवडे यांनी मानले.या लोकार्पण सोहळ्यासाठी बँकेचे माझी चेअरमन अरुण आलासे, मोन्नाप्पा चौगुले,ग्रा.प सदस्य, ठेवीदार,नागरिक उपस्थित होते.माधवनगर येथे अर्बन बँकेच्या २२ व्या शाखेची उद्घाटन



# ना. पंकजाताई मुंडे यांनी केले पांडे, शर्मा, जाधव कुटुंबियांचे सांत्वन

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शहरातील राजाभैय्या पांडे, पत्रकार रामप्रसाद शर्मा आणि जाधव परिवारातील सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन केले व धीर दिला.

माजी नगरसेवक राजाभैय्या पांडे यांच्या मातोश्री सुनिती पांडे, पत्रकार रामप्रसाद शर्मा यांच्या मातोश्री फुलाबाई शर्मा व चिरंजीव गोपाल शर्मा तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या अर्चना रोडे यांचे बंधू प्रितम जाधव यांचे नुकतेच दु:खद निधन झाले होते. कुटुंबातील सदस्यांच्या जाण्याने त्यांच्या परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला होता. आज ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्वांच्या घरी जाऊन परिवाराचे सांत्वन केले व धीर दिला. यावेळी भाजपचे पदाधिकारी त्यांच्यासमवेत उपस्थित होते.

# विविध प्रमाणपत्र व आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

## उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील व तहसीलदार यांची उपस्थिती

ब्रम्हपुरी / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

ब्रह्मपुरी तालुक्यातील व मुख्यालयापासुन २५ किलोमिटर अंतरावर असलेल्या व भटक्या जमाती यांचे १५ कुटुंबाचे वास्तव्य असलेल्या मौजा गणेशपुर व पातळी गोपाळ पुरी या गावात संबंधितांना जात प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्र वितरित करण्याकरीता मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे १०० दिवसांचे कार्यक्राअंतर्गत तहसील कार्यालय ब्रम्हपुरी चे वतीने विशेष शिबिराचे आयोजन शुक्रवार दिनांक ४ मार्च ला करण्यात आले. शिबिरास उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील , तहसीलदार सतीश मासाळ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विविध प्रमाणपत्रांचे वितरण केले.आणि शासकीय विविध योजनांची माहिती सांगितली.



दरम्यान शिबिरात जात प्रमाणपत्र , जन्म प्रमाणपत्र वितरित करण्याकरीता अर्ज भरून घेण्यात आले. तसेच उत्पन्न प्रमाणपत्र,नवीन रेशनकार्ड चे वितरण ,आधार अपडेट व आधार संबंधीत कामे , जन धन बँक खाते तयार करणे , संजय गांधी योजना तसेच आरोग्य तपासणी शिबिरात -२०९ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.आणि उत्स्पूर्थ प्रतिसाद मिळाला .शिबिरास नायब तहसीलदार आशिष तालेवार,महानंदा मडावी , नायक तहसीलदार लीना बोबाटे , ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी चे डॉ. श्रीकांत कामडी व अन्य वैद्यकिय चमू,भारतीय स्टेट बँक ब्रम्हपुरी विजय कुमार शर्मा व त्यांची टीम, प्राथमिक आरोग्य केंद्र मेंडकी यांची टीम, सरपंच, पोलीस पाटील,ग्राम महसूल अधिकारी घनश्याम राऊत , ग्रामसेवक मने, पुरवठा विभाग दिलीप मेश्राम, ऑपरेटर,महसूल सेवक ठवकर गांगलवाडी , आधार केंद्र चालक कुथे, सीएससी केंद्र चालक कलमगाव लिंगायत उपस्थित होते. व गावातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक आकाश भाकरे मंडळ अधिकारी गांगलवाडी यांनी केले.



## अभिषेक प्रमोद नागरे या तरुणाने शिर्डीतील पहिले न्यायाधीश होण्याचा मान मिळवल्याबद्दल सत्कार

शिर्डी / संजय महाजन (दै.महाभारत)

शिर्डीतील सामाजिक कार्यकर्ते प्रमोद भाऊ नागरे यांचे चिरंजीव अभिषेक प्रमोद नागरे या तरुणाने शिर्डीतील पहिले न्यायाधीश होण्याचा मान मिळविला आहे. इतक्या तरुण वयात न्यायाधीश होणारे ते शिर्डीतील पहिलेच यशस्वी तरुण असून त्यांच्या निवडीबद्दल शिर्डीचा अभिमान आहे.त्यांच्या न्यायाधीश पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना मा.दत्तू शिंदे पाटील, गफ्फरखान पठाण, नानासाहेब शिंदे पाटील, कामगार मोर्चा उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष , हिम्मतराव होळकर, पत्रकार संजय महाजन, व मित्र परिवार उपस्थित होते.

# सिंधीकाळेगाव येथे जिवंत सातबारा मोहीम सुरू

सिंधीकाळेगाव/प्रतिनिधी
(दै.महाभारत)

शेतजमिनीच्या मालकी हक्कात अडथळा ठरणाऱ्या मयत खातेदारांच्या नावांची सातबारा उताऱ्यावरून नोंद कमी करून त्या जागी त्यांच्या अधिकृत वारसांची नावे लागण्यासाठी महसूल विभागाच्या शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रम आराखड्याअंतर्गत १ एप्रिलपासून राज्यात 'जिवंत सातबारा मोहीम' राबवण्यात येत आहे.जालना तालुक्यातील सिंधीकाळेगाव येथे जिवंत सातबारा मोहिमेला सुरुवात झाली. यावेळी



ग्राम महसूल अधिकारी गजानन बारवाल यांनी चावडी वाचनाच्या माध्यमातून मयत खातेदार व त्यांच्या वारसांबद्दल माहिती घेतली. यावेळी सरपंच सुभाष गिराम.ग्रामपंचायत सदस्य राम खर्जुले.सारंगधर खर्जुले.गणेश गिराम.गणेश गिराम.संतोष गिराम आदी उपस्थित होते.

ज्या शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर मयत खातेदारांची नावे अनेक वर्षे आहेत व त्यांची वारस नोंद झालेली नाही, अशा मयत खातेदारांचे वारस दाखल करण्यासाठी महसूल विभागाने जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत ठरावीक कालमर्यादा निश्चित केली आहे. सर्व पात्र शेतकरीबांधवांनी आपली अधिकृत कागदपत्रे वेळेत सादर करून मोहिमेचा लाभ घ्यावा व आपल्या जमिनीचे मालकी हक्क सुरक्षित करा,असे आवाहन ग्राम महसूल अधिकारी गजानन बारवाल यांनी केले आहे.ग्राम महसूल अधिकारी गजानन बारवाल यांनी मौजे.सिंधीकाळेगाव येथे चावडीच्या ठिकाणी गाव नमुना आठ-अ चे वाचन करून मयत खातेदार यांची यादी बनवली.

# शेतीत जा - ये साठी हेलिकॉप्टर खरेदी करिता १० कोटी कर्जाची शेतकऱ्याची मागणी

गेवराई / प्रतिनिधी

शेतात जाण्यासाठी रस्ता - पाणंद मार्ग नसल्याने बंगाली पिंपळा ता . गेवराईच्या शेतकऱ्याने भारताच्या केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना हेलिकॉफ्टर खरेदी करण्यासाठी १० कोटी रुपये कर्ज मंजूर करावे ,अशा आशयाचे निवेदन पाठवले आहे . गेवराई तालुक्यातील शेतकरी पुत्र राजेंद्र नवले यांनी कृषिमंत्री ना . शिवराजसिंग यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,

मी अल्पभूधारक गरीब शेतकरी पुत्र आहे. गट नंबर १३४१ मध्ये माझ्या मालकीची एक हेक्टर ६२ आर जमीन आहे .शेतात बैलगाडी .ट्रॅक्टर. शेती अवजारे .बी बियाणे आणि रासायनिक खते नेण्या - आणण्यास अडचण निर्माण होत आहे तसेच शेतीमाल आणण्यासाठी अडचण निर्माण होत आहे . गाडी बैल शेतात ने आण करता येईल असा कायमस्वरूपी रस्ता मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ अन्वये शेती साठी रस्ता देणे बाबत दि. १६/ १२/ २०११ रोजी लेखी अर्ज गेवराई महसूल विभागास सादर केला होता .दि. १६/० १/ २०२५ रोजी लेखी निवेदन सादर केले होते परंतु अजूनपर्यंत दखल घेतली गेली नाही .मी गरीब आहे . रोज मजुरी केली तरच माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत आहे .कृषी पायाभूत सुविधा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे शेती करता यावी यामध्ये रस्ते, विहीर,शेत दूरस्थ,सिंचन, गोदाम,कृषी क्षेत्र हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असल्यामुळे मुलांचे शिक्षण,आरोग्य या सर्व आर्थिक परिस्थितीत मी हतबल झालो आहे . शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने मला हेलिकॉप्टर खरेदी साठी कर्जाची आवश्यकता आहे . हेलिकॉप्टरने शेतात येणे जाणे करून शेती करु शकतो. कृषी पायाभूत सुविधा योजनेअंतर्गत १० कोटी रुपये कर्ज उपलब्ध करून द्यावे अशी मागणी निवेदनाद्वारे शेतकरी पत्र राजेंद्र नवले यांनी केली आहे . निवेदनाच्या प्रती माहितीस्तव ना .देवेंद्रजी फडणवीस , मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई, ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,ना.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई , ना . चंद्रशेखर बावनकुळे , महसूलमंत्री , महाराष्ट्र राज्य ,ना. माणिकराव कोकाटे , कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य, .कृषी आयुक्त कृषी आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य पुणे , जमाबंदी आयुक्त आणि संचालक , भुमिअभिलेख मुख्यालय महाराष्ट्र, राज्य पुणे. यांना शेतकरी पूत्र राजेंद्र बाबुराव नवले यांनी पाठविल्या आहेत .

# श्रीक्षेत्र सोनेवाडी येथे आजपासुन श्री हनुमान जन्मोत्सव

## १०८ कुंडात्मक सहस्त्रचंडी महायज्ञ व श्री दुर्गासप्तशती सामुदायिक पारायण सोहळा


निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

सद्गुरु विश्वनाथ महाराज यांच्या आशिर्वादाने श्रीक्षेत्र सोनेवाडी बु येथे श्री ॐ नव चैतन्य कानिफनाथ महाराज आश्रमात १०८ कुंडात्मक सहस्त्रचंडी महायज्ञ व श्री दुर्गासप्तशती सामुदायिक पारायण सोहळा आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात अनेक थोर संत महात्म्यांची उपस्थिती राहणार असुन संतसंग व दर्शनाचा आपण लाभ घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक ॐ नव चैतन्य कानिफनाथ महाराज आश्रम, सोनेवाडी बु.मठाधिपती श्री श्री महंत दिगंबरगिरीजी महाराज (आण्णा बाबा) समस्त पंचक्रोशितील सर्व साधक समुह परिवार व ग्रामस्थ यांनी केले आहे.

दैनंदिन कार्यक्रम रुपरेषा पुढीलप्रमाणे----

रविवार ६ एप्रिल रोजी स.०७ ते १२: श्री दुर्गा सप्तशती सामुदायीक पाठ दु.०३ ते ०६: श्री दुर्गा सप्तशती सामुदायीक पाठ, सायं ०६ ते ०७: हरिपाठ सायं. ०७ ते ०९ वा. संगितमय श्री नवनाथ कथा रात्री ०९ ते १०: महाप्रसाद मंगलचरण, श्रीगुरु वंदना, संत वंदना, मक्त वंदना, श्री नवनाथ महात्म्य, उमामहेश्वर संवाद, दादा गुरु मच्छिंद्रनाथ जन्म कथा, सोमवार ७ एप्रिल रोजी स.०७ ते १२: श्री दुर्गा सप्तशती सामुदायीक पाठ दु.०३ ते ०६ श्री दुर्गा सप्तशती सामुदायीक पाठ,सायं ०६ ते ०७ : हरिपाठ सायं. ०७ ते ०९ वा. संगितमय श्री नवनाथ कथा रात्री ०९ ते १० : महाप्रसाद, मच्छिंद्रनाथ महाराजांचे तपपूती, बजरंगबली व मच्छिंद्रनाथांची भेट, जगदंबा मातेचे दर्शन, विधी व व्रत उपासना, श्रीराम-लक्ष्मण दर्शन, मंगळवार ८ एप्रिल रोजी स.०७ ते १२: शांतीसुक्त वेद पठण, प्रधान संपल्प, गणेश पुजनादि, पंचागविधी, सद्गुरु पादुका, पूजन, ऋत्विक वर्णम, मंडप प्रवेश, गुरु गोरक्षनाथांचा जन्म, गुरु गोरक्षनाथांचे तपपुर्ती, मच्छिंद्रनाथांचा व गोरक्षनाथांचा सांद, गहिनीनाथांचा जन्म, दु.०३ ते ०६: वास्तु पुजन





श्री श्री महंत दिगंबगिरीजी महाराज (आण्णा बाबा)

प्रधान देवता स्थापना, अग्निमंथन, नवग्रह, मंडल स्थापना ग्रह हवन सायं पुजन आरती मंत्र पुष्पांजली, सायं ०६ ते ०७: हरिपाठ सायं. ०७ ते ०९ वा. संगितमय श्री नवनाथ कथा रात्री ०९ ते १०: महाप्रसाद,श्री जालिंदरनाथांचा जन्म, श्री कानिफनाथांचा जन्म,

बुधवार ९ एप्रिल रोजी स.०७ ते १२: शांतीसुक्त वेद पठण, स्थापित देवता पुजन, सहस्त्रचंडी स्वाहाकार के दु.०३ ते ०६ सहस्त्रचंडी याग, प्रधान हवन, सायम पुजन, आरती,मंत्र पुष्पांजली सायं ०६ ते ०७: हरिपाठ सायं. ०७ ते ०९ वा. संगितमय श्री नवनाथ कथा रात्री ०९ ते १० मैनावतीला उपदेश, गोपींचंदाला उपदेश, मारुती व कानिफनाथ यांची भेट, श्री कानिफनाथ व श्री गुरु गोरक्षनाथ यांची भेट, श्री जालिंदरनाथ व श्री कानिफनाथ यांची भेट, गुरुवार १० एप्रिल रोजी स.०७ ते १२: शांतीसुक्त वेद पठण, स्थापित देवता पुजन, प्रधान हवन कुंकुमार्चन / बिल्वार्चन दु.०३ ते ०६, सहस्वचंडी याग, प्रधान हवन, सायंम पुजन, आरती, मंत्र पुष्पांजली सायं ०६ ते ०७ हरिपाठ सायं. ०७ ते ०९ वा. संगितमय श्री नवनाथ कथा रात्री ०९ ते १० महाप्रसाद श्री गोरक्षनाथांस श्रीराम व मारुती यांची भेट, श्री दादागुरु मच्छिंद्रनाथ व श्री गुरु गोरक्षनाथ यांची भेट, श्रीगुरु गोरक्षनाथ, श्रीगुरु मच्छिंद्रनाथ मिननाथ यांची तिर्थयात्रा, शुक्रवार ११ रोजी स.०७ ते १२: शांतीसुक्त वेद पठण, स्थापित देवता पुजन, प्रधान हवन दु.०३ ते ०६ सहस्त्रचंडी याग, प्रधान हवन, सायंम पुजन, आरती, मंत्र पुष्पांजली सायं ०६ ते ०७ हरिपाठ सायं. ०७ ते ०९ वा. संगितमय श्री नवनाथ कथा रात्री ०९ ते १०: महाप्रसाद गभांगिरी पर्वतावर भंडारा, भर्तरीला उपदेश, पिंगला स्वर्गारोहून, चौरंगीनाथ जन्म, राजायुधिष्टीर राज्याभिषेक, संपुर्ण कथासार, शनिवार १२ रोजी स.०७ ते १०: शांतीसुक्त वेद पठण, स्थापित देवता पुजन, प्रधान हवन, श्री नवचैतन्य कानिफनाथ महाराज अभिषेक व महापुजा, उत्तरांगहवन, महाबली पुजा, कालिकापुजन, भैरव पुजन, हनुमान पुजन, सहस्त्रचंडी महायागाची पुर्णाहुती. ह.भ.प. गोविंद महाराज गोरे (आळंदी देवाची) यांचे सकाळी ०९.०० वा. काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल.

यज्ञाचे प्रधान आचार्य :वेद शाख संपन्न आचार्य श्री दत्तात्रेय काकडे, गुरुजी (नाशिक), उपस्थित ब्रम्ह वृंद, तबलावादक श्री.ह.भ.प. संजय महाराज काळे खडक माळेगांवकर ,गायनाचार्य ह.भ.प. आकाश महाराज पोळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज झांबरे, पियानो ह.भ.प.अविनाश महाराज शिंदे, ह.भ.प.ललित महाराज शिंदे, बासरी, ह.भ.प.गणेश महाराज आरवार, काकडा भजन नेतृत्व ह.भ.प.गणपत महाराज लगड, ह.भ.प.गयाजी नाना पडोळ, ह.भ.प.आनंदा महाराज साळुंखे, पंचक्रोशीतील भजनी मंडळ नानाजी महाराज भजनी मंडळ सोनेवाडी बु.,पंचक्रोशीतील भजनी मंडळ भाविकांसाठी सुचना १) पारायणास व होमासाठी बसणाऱ्या सर्वांची भोजन व निवासासाठी व्यवस्था समिती मार्फत करण्यात आलेली आहे. २) येण्याऱ्या भाविकांनी आपल्या सोबत ग्रंथ, अंथरून पांघरून, तांब्या, बॅटरी, नित्याचे कपडे, गोळ्या ओषधे इ. सोबत आणावे.टिप: सर्व धर्मानुरागी महिला व पुरुषांना दुर्गा सप्तशती १००८ सामुदायिक पाठासाठी बसावयाचे असल्यास आश्रमात नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे.



# रसिक नगर भिम जयंती मंडळाच्या वतीने सम्राट अशोक यांची जयंती साजरी

धर्माबाद / राहुल वाघमारे
(दै.महाभारत)

ड्नागसेन परिसर रसिक नगर भिम जयंती मंडळाच्या वतीने मौर्य राजवंशाचा राजा अशोक सम्राट यांची जयंती दि.५ एप्रिल रोजी महाकारुणीक भगवान बुद्ध , सम्राट अशोक, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तर जयंती मंडळाचे अध्यक्ष अजय सुर्यवंशी यांच्या हस्ते पंचरंगी ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी मराठी पत्रकार संघाचे जिल्हा संघटक जी.पी.मिसाळे सर यांनी सम्राट अशोक यांच्या कार्याबद्दल माहिती सांगताना म्हणाले सम्राट अशोक हा मौर्य राजवंशाचा शासक होता.सम्राट अशोकाने अखंड भारतावर राज्य केले. त्याच्या कारकिर्दीतच बौद्ध धर्म संपूर्ण जगात पसरला म्हणून बौद्ध धर्माचा सर्वात लोकप्रिय राजा होता.तथागत भगवान गौतम बुद्धांच्या जन्मापासून ते महापरिनिर्वाण पर्यंतच्या स्थळी बुद्ध विहार स्तुप, शिलालेखासह चौर्यांशी हजार बौद्ध मंदिर बांधले,भगवान बुद्धा नंतर सम्राट अशोक हे जगातील धम्मच्रक पर्वतक होते, महेंद्र आणि संघमित्रा हे बौद्ध धर्म सातासमुद्रापार पलीकडे नेणारे दुसरे धम्मचक्र प्रवर्तन होते तिसरे धम्मचक्र प्रवर्तन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते.

सम्राट अशोकाने अखंड भारतावर राज्य केले. त्याच्या कारकिर्दीतच बौद्ध धर्म संपूर्ण जगात पसरला होता.शिध्दार्थ वाघमारे सरांनी सम्राट अशोक यांच्या काव्यातुन गुणगान केले.यावेळी जयंती मंडळाचे अध्यक्ष अजय सुर्यवंशी, सचिव अशोक कांबळे मरवाळीकर, सहसचिव उदयकुमार वाघमारे, कोषाध्यक्ष गौतम मिसाळे, प्रसिध्दी प्रमुख लक्ष्मण तुरेराव, सल्लागार पंडित जोंधळे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त जी.एम.वाघमारे, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भगवानराव कदम, डॉ.सुरेश देवे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सि.एन.वाघमारे, नागोराव कांबळे कार्लेकर, नगर पालिका कर्मचारी किशनराव सोनकांबळे, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संघटक सुभाष कांबळे, तालुका कोषाध्यक्ष सदानंद देवके,एम.एस.ई.बी. कर्मचारी सुहास वाघमारे, पत्रकार गंगाधर धडेकर यांच्या सह अनेक बौद्ध उपासक उपस्थित होते.

# एटारी, पुणे येथे किण्वित जैविक खत वापर कार्यशाळा संपन्न

## (नॅचरल शुगरचे सभासद शेतकरी देवरवाडे व सिडिओ येळकर यांनी नोंदवला सहभाग.)

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै. महाभारत)

केंद्र शासनाने रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय व जैविक खतांच्या वापरास चालना देण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलले असून जैविक खतांचा वापर शेतकऱ्यांनी करण्यासाठी केंद्र शासनाच्या भारतीय कृषी संशोधन परिषद (आईसीएआर) संस्थेला संलग्न असलेल्या कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग संशोधन संस्था (एटारी), पुणे यांना विविध पिकासाठी जैविक खतांचा वापर अवलंबण्यासाठीच्या पद्धतीचे वेळापत्रक करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने दिनांक ३ एप्रिल रोजी एटारी, पुणे यांनी कृषी विज्ञान केंद्रां (केव्हीके) मार्फत फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर अर्थात 'किण्वित जैविक खत (एफओएम) आणि द्रव किण्वित जैविक खत (एलएफओएम)' च्या प्रसारासाठी जागरूकता आणि प्रात्यक्षिक कार्यशाळा यशस्वीपणे आयोजित केली. या कार्यक्रमात महाराष्ट्र आणि गुजरातमधील कृषी विज्ञान केंद्रांचे २५ शास्त्रज्ञ, सीबीजी प्लांट प्रतिनिधी आणि प्रगत शेतकरी सहभागी



झाले. सदर कार्यशाळेमध्ये नॅचरल शुगरचे चेअरमन तथा कार्यकारी संचालक बी बी ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस विकास अधिकारी श्री. शिवप्रसाद येळकर यांनी सहभाग नोंदवून उपस्थित शास्त्रज्ञांना नॅचरल शुगर रांजणी कारखान्यात ऊसाची मळी आणि नेपियर गवत पासून कॉम्प्रेस्ड बायो गॅस (सीबीजी) प्लांटमधील अवशिष्ट पदार्थांपासून किण्वित जैविक खत तयार करण्याची पद्धती तसेच कारखान्याच्या प्रक्षेत्रावर ऊस पिकामध्ये एफओएम आणि एलएफओएम चा वापर करण्यासाठी अवलंबलेली पद्धती व त्याचे झालेले फायदे बाबत माहिती दिली. नॅचरल शुगरचे सभासद शेतकरी रवींद्र देवरवाडे यांनी दृकश्राव्य प्रणालीद्वारे सदर चर्चा सत्रामध्ये भाग घेऊन नॅचरल शुगर उत्पादित एफओएम, नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर चा वापर केल्यामुळे झालेले फायदे बाबत शास्त्रज्ञांना माहिती दिली. सदर चर्चासत्रामध्ये आयसीएआर-एटारी, पुणेचे संचालक डॉ. सुब्रत कुमार रॉय यांनी रासायनिक खतांचा अवलंब कमी करून जैविक खतांचा वापर करणे आवश्यक आहे बाबत मत व्यक्त करून उपस्थित शास्त्रज्ञांना त्यांच्या अधिनस्त कृषी विज्ञान केंद्रांच्या प्रक्षेत्रावर एफओएम आणि एलएफओएम या खतांचे प्रात्यक्षिक आयोजित करून शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या यावेळी डॉ. व्यंकट मायंदे, माजी कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, आयसीएआर-एटारी, पुणेचे माजी संचालक डॉ. लाखन सिंग, कृषी महाविद्यालय पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. एम. एस माने आदी शास्त्रज्ञ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निफाड येथे शिक्षक समितीचा शैक्षणिक मेळावा व श्री स्वामी समर्थ महाराज प्रगट दिन उत्साहात संपन्न

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

निफाड येथील महालक्ष्मी मंगल कार्यालय रसलपुर फाटा येथे दुपारी ०२ ते ०६ या वेळेत श्री स्वामी समर्थ गृप व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा निफाड यांच्यावतीने श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन उत्सव समिती निफाड यांच्या संयुक्त वतीने आयोजित भव्य शैक्षणिक व अध्यात्मिक मेळाव्यात रक्तदान शिबिरासह गुणवंत शिक्षकांचा सत्कार,उपक्रमशील व आदर्श शाळा पुरस्कारार्थी शिक्षकांचा व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांचा सन्मान ,सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी यांचा तसेच उपक्रम शील कर्मचारी व अधिकारी यांचा गुणगौरव व नवोदय विद्यालय प्रवेशपात्र विद्यार्थी व पालकांचा सत्कार आदी विविध सामाजिक शैक्षणिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन कार्यक्रमाला उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित शिक्षक वृंद स्वामी भक्तांचे साक्षीने करण्यात आले होते. सर्व सत्कार कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराज प्रतिमेचे पूजन करून तसेच दिप प्रज्वलनाने करून करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी व उपस्थितांनी अर्पण रक्तपेढी द्वारे राष्ट्रास रक्तदान अर्पण करून व श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकटदिनानिमित्त



आयोजित भव्य महाप्रसादाचे सेवन करण्यात आले.याप्रसंगी नाशिक जिल्हा परिषदेचे मा अध्यक्ष तथा मराठा विद्याप्रसारक शिक्षण संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षिरसागर बोलताना म्हणाले की गेली विस वर्ष श्री स्वामी समर्थ ग्रुप व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती निफाड शाखेने श्री स्वामी समर्थ महाराज प्रगट दिन व गुणवंत गौरव समारंभ,रक्तदान शिबिराचे आयोजन करून गौरवास्पद कार्य केले आहे,मी शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध असून १५मार्च २०२४ चा अन्यायकारक जी आर रद्द करणेसाठी शासन स्तरावरून शिक्षणमंत्री ना दादासाहेब भुसे यांना विनंती करू असे आश्वासन क्षिरसागर यांनी दिले

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे माजी राज्याध्यक्ष काळूजी बोरसे पाटील हे होते.याप्रसंगी प्रमुख अतिथी निफाड पं स चे माजी सभापती शिवा पाटील सुरासे बोलताना म्हणाले की शिक्षकांचे प्रश्न सोडविणेसाठी सदैव प्रयत्नशील राहणार असून शासन स्तरावर अन्यायकारक संच मान्यता जी आर रद्द करणेसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून शिक्षक समितीने वीस वर्षे सातत्य ठेऊन गुणवंत शिक्षक,शाळा,सेवानिवृत्तांचा सत्कार,रक्तदान शिबिर,स्वामी समर्थ महाराज प्रगट दिन आदी उपक्रम सुरू ठेऊन नवा आदर्श निर्माण केला आहे त्याबद्दल शिक्षक समिती शाखेला धन्यवाद दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे माजी राज्य उपाध्यक्ष पांडुरंग कर्डिले यांनी केले.मनोगत व स्वागत तालुका अध्यक्ष संजय गवळी यांनी केले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निफाड तालुका शिक्षक समितीचे कार्याध्यक्ष नवनाथ सुडके यांनी केले.स्वागत समितीचे तालुका अध्यक्ष संजय गवळी यांनी केले, आभार समितीचे तालुका नेते अविनाश बागडे व सरचिटणीस खंडु किट्टे यांनी मानले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षक समितीचे राज्य नेते उदय शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की शिक्षक समितीचे माजी राज्य उपाध्यक्ष व श्री स्वामी समर्थ महाराज यांचे भक्त मा राज्यउपाध्यक्ष पांडुरंग कर्डिले यांच्या नेतृत्वात शिक्षक समिती निफाड तालुका शाखा दरवर्षीच शिक्षक विद्यार्थी कर्मचारी अधिकारी यांच्या गुणगौरवाबरोबरच,सेवानिवृतांचा सत्कार, रक्तदानासारख्या कार्यक्रमाचे आयोजन करून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या विचारांचेही प्रसार व प्रचाराचे पुण्यकर्म अव्याहतपणे एकवीसाव्या वर्षी सुद्धा सुरू ठेवले असून शिक्षक विद्यार्थी यांचे हिताबरोबरच शिक्षक समितीचे हे कार्य केवळ विद्यार्थी व शिक्षक घडविणारेच नाही तर समाजही घडविणारे आहे असे गौरवोद्गार काढले.

# श्रीराम नवमी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा सोहळ्याचे आयोजन

भाविक भक्तांनी लाभ घ्यावा
माजलगाव : अमर साळवे
(दै.महाभारत)

शहरातील नवनाथ नगर येथे सोळा वर्षापासून श्रीराम नवमी सोहळा साजरा केला जातो निमित्त याहीवर्षी अखंड हरिनाम सप्ताह व श्री ह.भ. प. परमेश्वर महाराज फपाळ यांच्या वाणीतून दिनांक ०६ एप्रिल ते १२ एप्रिल २०२५ पर्यंत शिवपुराण कथा होणार असून या कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त नवनाथ नगर महिला मंडळ माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.



प्रति वर्षाप्रमाणे गेल्या सोळा वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा संगीत कथा प्रवक्ते श्री ह.भ.प. परमेश्वर महाराज फपाळ यांच्या सुश्राव्यवाणीतून कथा होणार आहे तसेच संगीत साथ शिथवादक व गायक श्री एकनाथ महाराज कोंडवणे, तबला विशादक श्री संदीप महाराज नरके यांची साथ लाभणार आहे व विष्णू सहस्त्रनाम नेतृत्व श्री श्रीरामजी मुंदडा, ज्ञानेश्वरी नेतृत्व सौ. मीराताई डहाळे, शिवहर गायगवे यांचे असणार आहे या सप्ताहामध्ये दैनिक कार्यक्रम पुढील प्रमाणे सकाळी ०७ ते ०८ विष्णू सहस्त्रनाम,०८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, ०१ ते ०४ नामास कीर्तन भजन, मंगळवारी सुंदर कांड, ०५ ते ०६ सामूहिक हरिपाठ महिला मंडळ नवनाथ नगर व तसेच रात्री ०७ ते १० शिवपुराण कथा होईल तसेच या कथेची सांगता १२ एप्रिल रोजी श्री.ह.भ. प.परमेश्वर महाराज फपाळ यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल व महाप्रसाद श्री नरेंद्र प्रभाकर डुकरे यांच्या वतीने होईल तरी सर्व कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन नवनाथ नगर महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# युवकांना स्वावलंबन व आर्थिक स्थैर्य प्रदान करणारा उत्तम मार्ग म्हणजे रेशीमउद्योग: डॉ. आर. पी. कावणे

कुडूत्री / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

कमी गुंतवणूक व कमी वेळेत अधिक आर्थिक फायदा देणारा शेतीपुरक व्यवसाय म्हणून रेशीमशेतीकडे पाहिले जाते. रेशीम कीटक पालन, कोष उत्पादन व धागा निर्मिती अशा विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा हा व्यवसाय ग्रामीण उद्योजकता वाढीसाठी महत्वपूर्ण आहे. बेरोजगारीच्या गंभीर समस्येवर उपाय म्हणून स्वयंरोजगाराचा हा सर्वोत्तम मार्ग आहे. ग्रामीण भागातील युवक व महिलांनी शास्त्रीय प्रशिक्षण घेऊन रेशीमउद्योग सुरू केला तर स्वत:बरोबर ते समाजाचाही आर्थिक विकास साधू शकतात. असे प्रतिपादन रेशीमशेतीतज्ज्ञ व यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाचे डॉ. आर. पी. कावणे यांनी यांनी येथे व्यक्त केले.

ते गारगोटी (जि. कोल्हापूर) येथील मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालयात अंतर्गत दर्ज हमी कक्ष, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कक्ष व प्राणीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त




विद्यमाने आयोजित 'रेशीमशेती व रेशीमउद्योग' या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे होते.

यावेळी बोलताना डॉ. कावणे म्हणाले, रेशीमउद्योगामुळे शेतीपूरक उत्पन्नात लक्षणीय वाढ झाल्याचे व त्यायोगे ग्रामीण भागाचा विकास झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. युवकांनी या व्यवसायाकडे वळल्यास बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यास मदत तर होईलच पण त्यामुळे ग्रामविकासाला नवे बळ मिळेल. ग्रामीण युवकांनी स्वावलंबन व आर्थिक स्थैर्य प्रदान करणारा, उज्ज्वल भवितव्य घडवणारा एक उत्तम मार्ग म्हणून रेशीमउद्योगांकडे वळले पाहिजे.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास यशवंतराव पाटील महाविद्यालय, सोळाकुरचे डॉ. विश्वजित लगाडे, प्रा. चेतन भगत, प्रा. ऋतुजा लाड, प्रा. ज्योती गुरव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सागर व्हनाळकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रतिक्षा परदेशी यांनी केले. आभार डॉ. विलास जगताप यांनी मानले.


# फुलंब्री तालुक्यात अंगणवाडी भरती प्रक्रियामध्ये गैर प्रकार वाढले

## अनेकांनी बनावट दस्त सादर करत भरले फॉर्म

फुलंब्री / सुधाकर जेठे
(दै.महाभारत)

तालुक्यात अंगणवाडी सेविका/ मदतनीस पद भरती सन २०२५ मध्ये फुलंब्री तालुक्यातील वाघलगाव उमरावती जातवा सह अनेक गावातील सेविका/मदतनीस पदासाठीच्या बोगस कागदपत्रे सादर करून शासनाच्या फसवणूक करणारे उमेदवाराच्या दस्तताची चौकशी करून भरती रद्द करण्याबाबत अनेकांनी हरकती सादर केल्याने भरती प्रक्रियेत गैर प्रकार झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे .

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय पंचायत समिती फुलंब्री अंतर्गत अंगणवाडी सेविका/मदतनीस पद भरती सन २०२५ मध्ये फुलंब्री तालुक्यातील वाघलगाव उमरावती जातवा सह अनेक



गावातील सेविका/मदतनीस पदासाठीच्या बोगस कागदपत्रे सादर करून शासनाच्या फसवणूक करणारे उमेदवाराच्या दस्तताची चौकशी करून भरती रद्द करणे बाबत गणेश गाडेकर यांनी हरकत नोंदवली आहे

गुणाक यादी प्रमाणे प्राथमिक यादी प्रशिध्द करण्यात आली असून गुणाक यादीत आलेल्या उमेदवारानी अनेक दस्त बनावट सादर केले आहे विवाह नोंदणी प्रमाणपत्र बनावट दिसून येत आहे करिता शासनाला फसवून बनावट दस्त दाखवून भरती प्रकीयात उमेदवार यांनी बनावट दस्त सादर केल्या बाबत त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही होऊन करण्यात यावी त्यांची निवड रद्द करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे . तर प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयात आमच्या प्रतिनिधीने भेट दिली तेव्हा तालुका प्रकल्प अधिकारी यांच्या समोर राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांना अनेक इतर उमेदवाराचे अर्ज पहाणी साठी देऊन अनेक दस्त तालुका प्रकल्प अधिकार्याच्या समोर खाली वर करत असत प्रकल्प अधिकाऱ्यांना सल्ला देणे सुरु असल्याने तालुक्यात भरती प्रक्रियेत गैर प्रकार घडत असल्याचे उघड होत असून . या बाबत सदर बाब छुप्या कॅमेऱ्यात कैद झालेली आहे . सदर प्रकल्प अधिकारी यांची कार्य पद्धती संशयास्पद असून अनेक उमेदारांचे हितचिंतक आपल्या सोई प्रमाणे कागद काढणे कागद जोडणे इतरांचा फॉर्म मध्यव कशा व काय त्रुट्या आहेत . हे सर्व अँडजेस होत आहे का ? अशी शंका निर्माण होत आहे तेव्हा वरिष्ठांनी याची दखल घेण्याची मागणी करण्यात येत आहे. अनेकांचे दस्त हे फॉर्म भरण्याच्या मुदतीनंतर सादर करून घेत त्यांची निवड कशी होईल असा प्रयत्न तर होत नाही ना अशी शंका गणेश गाडेकर यांनी व्यक्त केली जात आहे .